मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-५२ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये







गाझामधील इस्त्रायलच्या हल्ल्यात 5 पत्रकारांचा मृत्यू

पान 8

## निवडणूक आयोगाविरोधात ‘इंडिया’चा एल्गार

# मोर्चा अडवला, बॅरिकेड टाकले... खासदारांना धक्काबुक्की

### राहुल गांधी प्रचंड आक्रमक





■ नवी दिल्ली

‘मतचोरी’च्या विरोधात इंडिया आघाडीचा मोर्चा संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या दिशेने निघाला होता. पण निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या अलिकडेच पोलिसांनी बॅरिकेट्स टाकून हा मोर्चा अडवला. खासदार अखिलेश यादव आणि काही खासदारांनी बॅरिकेड ओलांडून पुढे गेले. मात्र, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. यावेळी आंदोलनात जवळपास ३०० खासदार सहभागी झाले होते. या खासदारांसह विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी मोर्चा अडवत असताना खासदारांना धक्काबुक्कीही झाली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या खासदारांना पोलिस ठाण्यात नेले. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असलेल्या राहुल गांधी मतचोरीच्या मुद्यावर प्रचंड आक्रमक झाल्याचे पाहण्यास मिळाले. गांधी म्हणाले, ‘वास्तव हे आहे की ते चर्चा करू शकत नाहीत. कारण खरं काय ते देशाच्या समोर आले. ही जी लढाई आहे ती राजकीय नाही ही संविधानाची लढाई आहे. संविधान वाचवण्याची लढाई, एक व्यक्ती एक मतची लढाई आहे. त्यासाठी आम्हाला स्वच्छ आणि ओरीजनल मतदानयादी हवी आहे.’

पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी वाड्रा, संजय राऊत, सागरिका घोष आणि इतरांना खासदारांना ताब्यात घेत पोलिस ठाण्याकडे नेले. दिल्लीचे पोलिस आयुक्त दीपक पुरोहित यांनी सांगितले की, विनापरवानगी हा मोर्चा काढण्यात आला होता. खासदारांना धक्काबुक्की केल्याच्या आरोपांमध्ये तथ्य नाही. दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या खासदार मिताली बाग आणि महुआ मोईत्रा यांची प्रकृती बिघडली. त्या बेशुद्ध पडल्या.

पान 8 वर

## तटकरे रायगडमध्ये तर महाजन नाशिकमध्ये करणार ध्वजारोहण



**मुंबई :** रायगडच्या पालकमंत्रीपदाचा वाद शिगेला पोहोचला असताना, आता 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण कोण करणार याबाबतचा निर्णय जाहीर झाला आहे. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरुन महायुतीमध्ये तणाव आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी राष्ट्रवादीच्या अदिती तटकरे विरुद्ध शिवसेनेच्या भरत गोगावले यांच्यात संघर्ष आहे. तर नाशिकमध्ये भाजपचे गिरीश महाजन विरुद्ध शिवसेनेचे दादा भुसे असा वाद आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने कोणत्या जिल्ह्यात कोण ध्वजारोहण करणार याची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार रायगडमध्ये अदिती तटकरे तर नाशिकमध्ये गिरीश महाजन हेच ध्वजारोहण करणार आहेत. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच मंत्री भरत गोगावलेंची भाषा बदलल्याचंही पाहायला मिळालं होतं. राज्यातील कोणत्या जिल्ह्यात कोण पालकमंत्री याची यादी या वर्षाच्या सुरुवातीला 18 जानेवारीला जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर लगेचच म्हणजे 19 जानेवारीला नाशिक आणि रायगडमधील पालकमंत्र्यांची निवड काही तासातच रद्द करण्यात आली होती. रायगडच्या पालकमंत्रिपदी अदिती तटकरे आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदी गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, महायुतीतील तणावानंतर या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाला स्थगिती देण्यात आली होती. अद्यापही येथील पालकमंत्रीपदाचा वाद कधी राज्यात तर कधी दिल्ली दरबारी पोहोचत आहे. मात्र, आता महाराष्ट्रातील 34 जिल्ह्यातील ध्वजारोहण सोहळ्याची यादी जाहीर करण्यात आली आहे.

## पुणे जिल्ह्यात महिला भाविकांच्या गाडीला भीषण अपघात 10 जणी ठार, 28 गंभीर जखमी

प्रतिनिधी
■ पुणे



खेड तालुक्यातील पाईट येथील कुंडेश्वर देवदर्शनासाठी चाललेल्या पीकअप गाडीचा भीषण अपघात झाला. ही पीकअप गाडी पाच ते सहा पलटी घेत तब्बल १०० फूट खोल दरीत कोसळली. पीकअप गाडीत क्षमतेपेक्षा अधिक तब्बल ३८ महिला, मुलं खच्चून भरली होती. या अपघातामध्ये १० भाविक महिलांचा मृत्यू झाला असून, सुमारे २८ महिला, मुलं गंभीर जखमी आहेत. जखमींवर राजगुरुनगर, चाकण व भोसरी येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेत शोभा ज्ञानेश्वर पापळ (वय २७), सुमन काळूराम पापळ (वय ४७), शारदा रामदास चोरघे (वय ४५), मंदा कानिफ दरेकर, संजीवनी कैलास दरेकर (वय ५५), मिराबाई संभाजी चोरघे (वय ५५), बायडाबाई ज्ञानेश्वर दरेकर, शकुंतला तानाजी चोरघे (वय ५०), पार्वताबाई दत्तू पापळ आणि फसाबाई दत्तू सावंत या १० महिला भाविकांचा मृत्यू झाला.

यासह अलका शिवाजी चोरघे, रंजना दत्तात्रय कोळेकर, मालुबाई लक्ष्मण चोरघे, जया बाळू दरेकर, लताताई करंडे, ऋतुराज कोतवाल, ऋषिकेश करंडे, निकिता पापळ, जयश्री पापळ, शकुंतला चोरघे, मनीषा दरेकर, लक्ष्मी चंद्रकांत कोळेकर, कलाबाई मल्हारी लोंढे, जनाबाई करंडे, सुप्रिया लोंढे, निशांत लोंढे, सिद्धी ज्ञानेश्वर पापळ, कविता सारंग चोरघे, सुलाबाई बाळासाहेब चोरघे, सिद्धीकार रामदास चोरघे, छबाबाई निवृत्ती पापळ, सुलोचना कोळेकर, मंगल शरद दरेकर, पूनम वनाजी पापळ, जाईबाई वनाजी पापळ, चित्रा शरद करंडे, चंद्रभागा दत्तात्रय दरेकर आणि मंदा चांगदेव पापळ या महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर विविध रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

श्रावणी सोमवारनिमित्त पाईट गावच्या पापळवाडी येथील ३८ जण कुंडेश्वर देवदर्शनासाठी सोमवारी दि. ११ साडेअकराच्या दरम्यान गावातीलच पीकअप करून निघाले. या पीकअपमध्ये क्षमतेपेक्षा खूपच अधिक लोक बसले होते. यात तब्बल ३० महिला, ५ लहान मुले व २ पुरुष होते. कुंडेश्वर देवस्थान डोंगरावर असून मंदिराकडे जाणारा रस्ता अरुंद, तीव्र उतार व प्रचंड वळणांचा आहे. या घाटरस्त्यावर पीकअप चालकाचा वाहनावरील ताबा सुटला व पीकअपने पाच ते सहा पलटी घेत तब्बल १०० फूट दरीमध्ये कोसळली.

## पर्यटनासाठी गेलेल्या डॉक्टरचा बुडून मृत्यू, वाचवण्यासाठी गेलेला तरुणही बुडाला

प्रतिनिधी
■ मंचर



जिल्ह्यातील भिमाशंकरजवळील भिवेगाव देवकुंड धबधब्यात दुर्दैवी घटना घडली आहे. सहा डॉक्टरांची टीम फिरायला गेली होती. यावेळी एका डॉक्टरचा बुडून मृत्यू झाला आहे. सुबोध करंडे असं या डॉक्टरचं नाव आहे. सुबोध करंडे या बुडणाऱ्या डॉक्टरला वाचवण्यासाठी गेलेल्या स्थानिक तरुणाचा देखील बुडून मृत्यू झाला आहे. दिलीप वनघरे असं मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान, स्थानिकांच्या मदतीनं देवकुंडात रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे.

पुणे जिल्ह्यात आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारनिमित्ताने शिव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

## मंत्रालयात आता केवळ डिजिटल प्रवेश



### 15 ऑगस्टपासून नवी नियमावली

■ मुंबई

विधिमंडळ, सचिवालय आणि मंत्रालय या महत्त्वाच्या आणि प्रशासकीय व प्रमुख संस्था मुंबईत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मंत्रालयात नागरिक, राजकीय नेतेमंडळी, आमदार, खासदार, पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रमुख भेटी देत असतात. स्थानिक आणि जिल्हा पातळीवर आपली कामे रखडल्यानंतर संबंधित व्यक्ती वा संस्था मंत्रालयाचं दार ठोठावत असते. मात्र, आता मंत्रालयाचं दार सहजपणे ठोठावता येणार नाही. मंत्रालयीन प्रवेशासाठी सरकारने आता ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरू केली असून डिजी प्रवेश पास असल्याशिवाय तुम्हाला मंत्रालयात एंट्री मिळणार नाही.

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना आता केवळ डिजिटल प्रवेश पत्राद्वारेच प्रवेश देण्यात येईल. डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येणार आहे. येत्या 15 ऑगस्टपासून ही नवी कार्यप्रणाली लागू केली जात आहे.

## बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या, ईव्हीएम बंद करा!

### उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली ठाकरे सेनेचे आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई



"आज दोन ठिकाणी आंदोलनं करण्यात आली. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन करण्यात आलं. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडीचं दिल्लीत आंदोलन झालं. आंदोलन हे निवडणूक आयोगाविरोधात आहे. पण सरकार आणि भाजपा, यामध्ये का येतात? हे माहिती नाही. कारण त्यांनी मतांची चोरी केलीय, म्हणून ते मधे-मधे येतायेत. तसंच सर्वोच्च न्यायालयापेक्षाही निवडणूक आयोग मोठं झालंय का?," असा सवाल शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित करत निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारवर निशाणा साधाला. आज त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, भ्रष्टाचाराचे राज्यपालांना सर्व पुरावे दिले आहे, तरी सुद्धा राज्यपाल काही करत नाहीत. जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिलं जातं. पण आज लोकशाहीचा बळी किंवा लोकशाहीची हत्या होत आहे, हे सर्व जगानं पाहिलं आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर केली.

6 महिन्यात जवळपास 45 लाख मतं कशी वाढली, याचा जाब विचारण्यासाठी दिल्लीत इंडिया आघाडीनं आंदोलन केलं. परंतू हे आंदोलन दडपण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आता व्हीव्हीपॅट देखील काढले जात आहे. आमची मागणी आहे की, बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या आणि ईव्हीएम मशीन बंद करा, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.


## माझ्या अटकेसाठी शिंदे , फडणवीसांचा फोन - जाधव



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी मुंबईतील मेळाव्यातून मुख्यमंत्र्यांसह महायुतीमधील नेत्यांवर जोरदार हल्लाबोल केला. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावरील आरोपावर बोलताना, खेडमध्ये बारबाला नाचवून मोठे खड्डे पडलेत, अशी टीका भास्कर जाधव यांनी नाव न घेता रामदास कदमांवर केली. तसेच, मंत्री आणि संत्री कोण ? अधिकारी मला कापतात. मी यांचा बाप आहे, असे म्हणत जाधव यांनी आपण कुणालाही भीत नसल्याचे म्हटले. तसेच, मला अटक करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंपासून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रत्नागिरीच्या पोलिस अधीक्षकांना फोन करत दबाव टाकला होता, असा गौप्यस्फोटही भास्कर जाधव यांनी केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गुहागर विधानसभा मतदारसंघ, मुंबईवासी सहकाऱ्यांचा संवाद मेळावा दादर येथील शिवसेना भवनमध्ये संपन्न झाला. येथील मेळाव्यात बोलताना भास्कर जाधव यांनी गुहागर मतदारसंघ आणि स्थानिक राजकारणावरुन जोरदार हल्लाबोल केला. यावेळी, थेट ब्राह्मण विरुद्ध ओबीसी असे आक्रमक भाषण करत जाधव यांनी स्थानिक नेत्यांना इशाराही दिला आहे.

## युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी मोदींशी केली फोनवर चर्चा

■ किव्ह



युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सोमवारी पंतप्रधान मोदींना फोन करून त्यांच्याशी चर्चा केली. झेलेन्स्की यांनी एक्स वर याबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदींशी माझी दीर्घ चर्चा झाली. आम्ही द्विपक्षीय सहकार्य आणि जागतिक राजनैतिक मुत्सद्देगिरीवर सविस्तर चर्चा केली.

झेलेन्स्की यांनी मोदींना युक्रेनवरील रशियन हल्ल्यांबद्दल सांगितले. ते म्हणाले, मी त्यांना (पंतप्रधान मोदींना) आमच्यावरील रशियन हल्ल्यांबद्दल सांगितले, विशेषतः काल झापोरिझिया येथील बस स्थानकावरील हल्ल्याबद्दल, जिथे रशियाने जाणूनबुजून एका शहरावर बॉम्बहल्ला केला, ज्यामध्ये डझनभर लोक जखमी झाले.

झेलेन्स्की म्हणाले की, भारत आमच्या शांतता प्रयत्नांना पाठिंबा देत आहे आणि युक्रेनशी संबंधित प्रत्येक निर्णय युक्रेनच्या सहभागाने घेतला पाहिजे यावर सहमत आहे.

युद्ध वाढवण्याची रशियाची क्षमता कमी करण्यासाठी रशियावर निर्बंध लादण्याबद्दल आणि त्याच्या तेल निर्यातीवर मर्यादा घालण्याबद्दलही झेलेन्स्की यांनी मोदींशी चर्चा केली. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेदरम्यान मोदींना प्रत्यक्ष भेटण्याबद्दल झेलेन्स्की यांनी बोलले. तसेच, दोन्ही नेत्यांनी एकमेकांच्या देशांच्या भेटींचा विचार करण्याचा निर्णय घेतला आहे.

झेलेन्स्की म्हणाले की, रशियाला जमीन देऊन नव्हे तर न्याय्य पद्धतीने युद्ध संपवूनच शांतता प्रस्थापित होऊ शकते. ते म्हणाले, आम्ही दुसऱ्या फाळणीचा हा प्रयत्न हाणून पाडू. आम्हाला रशिया माहित आहे. जिथे दुसरी फाळणी होईल तिथे तिसरी फाळणी देखील होईल. म्हणूनच आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत. युद्ध शांतता आणि मजबूत सुरक्षा संरचनेने संपले पाहिजे.

## मराठा मोर्चात दंगली घडवण्याचा कट

प्रतिनिधी
■ जालना



आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी ‘चलो मुंबई’ चा नारा दिला आहे. मोर्चाची तयारी अंतिम टप्प्यात आल्याचेही समन्वयांकडून सांगण्यात येत असतानाच आता मराठा आंदोलनात दंगल घडवून आणण्याचा कट रचल्याचा आरोप करत समाजास सावध राहण्याचे आवाहन केल्याने खळबळ उडाली आहे.

मराठा समाजास ओबीसीमधून आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दोन वर्षापासून आंदोलन छेडले आहे. सातत्याने उपोषण, मोर्चे, रास्ता रोको आंदोलन करूनही सरकार मागण्यांकडे दुर्लक्षाचा आरोप करण्यात येत आहे. मराठा समाज मुळाचा ओबीसी असल्याच्या जवळपास 52 लाख कुणबी नोंदी शिंदे समिती मार्फत समोर आल्या आहेत.

राज्यातील सरसकट मराठा समाजास मराठा- कुणबी, कुणबी-मराठा एक म्हणून ओबीसीतून आरक्षण लागू करावे, हैद्राबाद संस्थान, सातारा संस्थान, कोल्हापुर संस्थानसह बॉम्बे गॅझेट लागू करावे यासह इतर मागण्यांसाठी **पान 8 वर**

# सामाजिक न्याय मंत्री शिरसाटांकडून मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला हरताळ

विशेष प्रतिनिधी
■ मुंबई



### वादग्रस्त अधिका-याची 'ओएसडी'पदी नेमणूक

प्रशासनाच्या कामकाजातील पारदर्शकता,शिस्त आणि गुणवत्तेवर आधारित काम पाहून महायुतीच्या मंत्र्यांच्या कार्यालयात खासगी सचिव आणि विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यास प्राधान्य देतानाच फिक्सरांना प्रतिनियुक्तीवर किंवा उसनवारीवर घेण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तीव्र विरोध असतानाही राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यालयात एका गंभीर प्रकरणी खातेनिहाय चौकशीत ठपका ठेवण्यात असलेल्या एका उपजिल्हाधिका-याची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केल्याची बाब समोर आली आहे.

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्री कार्यालयात कायम ठाण मांडून असलेल्या मंत्र्यांचे खासगी सचिव आणि विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्या गुणवत्तेवर करण्याच्या सूचना देतानाच फिक्सरांना प्रतिनियुक्तीवर किंवा उसनवारीवर घेण्यास नकार दिल्याने अजूनही काही मंत्र्यांच्या कार्यालयात खासगी सचिवांच्या नियुक्ता प्रलंबित आहेत. मात्र अनेक प्रकरणामुळे वादाच्या भोव-यात अडकलेले राज्याचे सामाजिक न्यायमंत्री यांच्या कार्यालयात सिद्धार्थ भंडारे यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केल्याने मंत्री शिरसाट पुन्हा अडचणीत येण्याची शक्यता आहे.भंडारे हे सध्या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात भूसंपादन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.भंडारे हे यापुर्वी चांडवड येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना एका गंभीर प्रकरणी त्यांची नुकतीच खातेनिहाय चौकशी करण्यात आली असून,त्यामध्ये त्यांच्यावर नियमबाह्य कामे केल्याचा आरोप करण्यात आला आहे.गौण खनिज उत्खननास परवानगी देताना जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिलेल्या जिल्हा खाणकाम योजनेमध्ये सामाविष्ट गटातून उत्खननास करण्यास परवाना देणे आवश्यक असतानाही संबधित प्रकरणात भंडारे यांनी अशी परवानगी देताना याची कार्यवाही केली नसल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे या प्रकरणाची नुकतीच सुनावणी पुर्ण झाली आहे.यामध्ये भंडारे यांनी बचावाचे अंतिम निवेदन सादर केले होते.त्यामध्ये त्यांनी त्यांच्यावरील दोषारोप अमान्य करीत,या प्रकरणातून दोषमुक्त करण्याची विनंती केली होती. मात्र त्यांची विनंती अमान्य करण्यात येवून त्यांच्यावर असलेले आरोप कायम ठेवण्यात आले आहेत.असे असतानाही भंडारे हे सामाजिक न्यायमंत्री शिरसाट यांच्या कार्यालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.या अधिका-याने मंत्री शिरसाट यांच्यासोबत नुकतीच परदेशवारी केल्याने ते वादात सापडले आहेत.नुकत्याच झालेल्या समाजिक न्याय विभागातील बदल्यांमध्ये भंडारे यांनी हस्तक्षेप केल्याची जोरदार चर्चा आहे.

वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५

**मुंबई :** सायन रेल्वे स्टेशनवर , मध्य रेल्वे मुंबई मंडल यांच्या वतीने येणाऱ्या १५ ऑगस्ट दिनाचे औचित्य साधून स्वतंत्रता दिवस उत्सव २०२५ स्वच्छता अभियान राबविण्यासाठी रेल्वे प्रशासन ने जनहितार्थ बॅनर लावला आहे. त्या वर भारत देशाच्या अशोक चक्रावर वर झाडू दाखविण्यात आलेला आहे. बॅनर डिझाईन तयार केल्यानंतर त्या विभागाचे प्रमुख अधिकारी यांनी सदर बॅनर योग्य तपासणी करूनच डिझाईन फायनल केली असेल ज्या अधिकारी यांनी यात निष्काळजी पण दाखवला आहे त्यांच्या वर भारत देशाच्या अशोक चक्राचा अवमान प्रकरणी भारतीय न्याय संहितअंतर्गत योग्य अशी कठोर कारवाई करावी. अशी मागणी होत आहे. वृत्तपत्र लेखक ,सामाजिक कार्यकर्ते नितीन कदम यांनी ही बाब रेल्वेच्या निदर्शनास आणुन दिली आहे.




## थोडक्यात

### विहिरीत बुडून 17 वर्षीय मुलाचा मृत्यू

**वसई :** वसई पूर्वेच्या धुमाळनगर येथे विहिरीत बुडून १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. रविवारी दुपारी बाराच्या सुमारास ही घटना घडली. समशूल खान असे बुडून मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. वसई पूर्वेच्या भागात धुमाळनगर परिसर आहे. या भागात असलेल्या विहिरीत रविवारी दुपारच्या सुमारास तीन ते चार मुलांचा गट पोहण्यासाठी आला होता. पाण्यात पोहत असताना समशूल हा मुलगा पाण्यात बुडाला. त्याच्या सोबत असलेल्या मित्रांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. या घटनेनंतर आजूबाजूच्या परिसरात मोठी खळबळ उडाली होती. येथील सामाजिक कार्यकर्ते नागेश शेळके यांनी याची माहिती पालिकेच्या अग्निशमन दलाला दिली होती. त्यानंतर त्यांनी शोध कार्य करून जवळपास पाच तासानंतर समशूल याला विहिरीतून बाहेर काढण्यात आले. तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घडलेल्या घटनेमुळे आजूबाजूच्या परीसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आठवडा भरापूर्वीच तुंगारेश्वर येथील नदीत बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. सातत्याने अशा बुडून मृत्यू होण्याच्या घटना समोर येत असल्याने नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

### राज्यात मॉडेल शासकीय सोलार जिल्हा स्पर्धेचे आयोजन: अतुल सावे

**मुंबई :** केंद्र शासनाच्या पीएम सूर्यघर, मुफ्त बिजली योजनेतंर्गत राज्यातील शासकीय इमारतींवर सौरऊर्जा प्रकल्पाची प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी 'मॉडेल शासकीय सोलर जिल्हा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज येथे दिली. राज्यातील सर्व शासकिय कार्यालयांवर सौर उर्जा प्रकल्पाची अमलबजावणी होण्यासाठी अपारंपरिक उर्जा विभागाने पुढाकार घेतला आहे. ज्या जिल्ह्यात जलद गतीने शासकिय इमारतींचे सौरिकरण करण्यात येईल, त्या जिल्ह्यास'मॉडेल शासकीय सोलार जिल्हा' म्हणून घोषित केले जाईल. यासाठी स्पर्धा घेतली जाणार असून यात सहभाग घेण्यासाठी विहित नमुन्यातील पत्र संबंधित जिल्हाधिकारी व महाव्यवस्थापक (महाऊर्जा) यांना प्रमाणित करून पाठवावे लागणार आहे. महाउर्जामार्फत पत्रांची छाननी केल्यानंतर ज्या जिल्ह्यात सर्वाधिक सौर उर्जा प्रकल्प स्थापित होतील, अशा जिल्ह्यांना मॉडेल शासकीय जिल्हा म्हणून जाहीर करण्यात येईल. १ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ही स्पर्धा घेण्यात येईल. प्रथम विजेत्यास पाच लाख रुपये, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह देण्यात येईल. द्वितीय पारितोषिक ३ लाख तर तृतिय पारितोषिकासाठी १ लाख रुपये दिले जाणार आहेत. नागरी सेवा दिनी( २१ एप्रिल २०२६) रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसईच्या हिरवळीवर परप्रांतीयांची 'नजर'

## सुट्टीच्या दिवशी दलालांचा राबता

## स्थानिक शेतकऱ्यांचा सातबारा बदलतोय

प्रतिनिधी
■ वसई



वसई पूर्व पट्टीतील डोंगरदऱ्या, खळाळणारे ओढे-नाले आणि हिरवळ यांचे निसर्गरम्य सौंदर्य आता केवळ स्थानिकांच्याच नाही तर परप्रांतीय धनदांडग्यांच्याही नजरेत भरू लागले आहे. सुट्टीच्या दिवशी फार्महाऊस किंवा प्लॉटिंगसाठी जमीन पाहण्याचा परप्रांतीय दलालांचा मोठा राबता ग्रामीण भागात दिसून येत आहे.

परप्रांतीय गुंतवणूकदार स्वस्तात जमिनी विकत घेऊन त्यावर बंगले, फार्महाऊस स्कीम किंवा औद्योगिक प्रकल्प उभारण्याच्या योजना राबवत आहेत. यामध्ये काही दलाल शेतकऱ्यांना "सोन्याचा भाव" मिळवून देण्याचे आमिष दाखवून जमिनी थेट धनदांडग्यांच्या नावावर करून घेतात.त्यामुळे सातबाऱ्यावरून स्थानिकांची नावे कायमची पुसली जात असल्याची खंत सुज्ञ नागरिक व्यक्त करत आहेत.एकेकाळी शेती व बागायती हा वसईच्या आगरी, कोळी, सामवेदी ब्राह्मण, भंडारी, कुपारी, वाडवळ, कुणबी, आदिवासी, बौद्ध अशा विविध समाजघटकांचा मुख्य व्यवसाय होता. मात्र पावसाचे अनियमित प्रमाण, ओला-सुका दुष्काळ आणि शहरीकरण-औद्योगीकरणाच्या लाटेमुळे शेतीचे उत्पन्न घटत चालले आहे. परिणामी अनेकांनी आपल्या जमिनी विक्रीस काढल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत वसईच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात परप्रांतीयांना जमिनी विकल्या गेल्या असून औद्योगिक प्रकल्पही वाढत आहेत. मात्र, या उद्योगांमध्ये काम करणारे मजूर प्रामुख्याने परप्रांतीयच असल्याने स्थानिकांच्या रोजगारावर गंडांतर आले आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागाच्या सांस्कृतिक व सामाजिक रचनेवरही परिणाम होऊ लागल्याचा इशारा सुज्ञ नागरिक देत आहेत.स्थानिकांनी आपली जमीन जपून ठेवावी आणि परप्रांतीय विक्रीला आळा घालावा, अन्यथा भविष्यात ग्रामीण वसईचे अस्तित्वच धोक्यात येईल, असा इशारा सुज्ञ नागरिकांनी दिला आहे.

## 'ठाकरे बंधू' युतीची शक्यता वाढली

# वसई- विरारच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल



प्रतिनिधी
■ वसई

दोन दशकांपूर्वी मराठी अस्मितेच्या प्रश्नावर वेगळे झालेले शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे अलीकडेच एकाच व्यासपीठावर एकत्र आले. या घटनाक्रमाने दोन्ही बंधूंमध्ये राजकीय मनोमिलन होण्याची शक्यता बळावली असून त्यांच्या संभाव्य युतीबाबत राज्यभरात चर्चा रंगल्या आहेत.

जर ही युती प्रत्यक्षात आली, तर तिचा प्रभाव फक्त राज्यभरच नाही तर वसई- विरार महापालिका निवडणुकीतही मोठ्या प्रमाणात जाणवेल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. युतीमुळे बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि भाजप-शिंदे गट-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीसमोर कडवे आव्हान उभे राहू शकते.वसई- विरारमध्ये उत्तर भारतीयांची संख्या लक्षणीय असली तरी मराठी मतदारही ठाम मतदानशक्ती राखून आहेत. स्थानिक भाषिक संस्कृती आणि परंपरा जपण्यासाठी पारंपरिक मराठी मतदार ठाकरे-राज युतीकडे झुकतील, असा अंदाज व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत, ही युती महापालिकेच्या राजकारणात 'किंगमेकर' ठरू शकते.भाजपने अलीकडील काळात वसई- विरारमधील तीन विधानसभा मतदारसंघ आणि लोकसभा काबीज करून राजकीय पकड मजबूत केली आहे. पक्षात इतर दलांमधून नेते-कार्यकर्त्यांचा ओघ वाढत असतानाच ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीने त्यांचे गणित ढवळून निघू शकते. बविआलाही याचा तितकाच फटका बसण्याची शक्यता आहे.युती झाली, तर भाजप व बविआमध्ये गेलेले काही स्थानिक नेते पुन्हा ठाकरे गट किंवा मनसेच्या दिशेने वळू शकतात, असे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे सध्याच्या प्रस्थापित पक्षांना आगामी महापालिका निवडणुकीत नवे आव्हान पत्करावे लागेल.

# सामाजिक कार्यकर्ते ॲड.निलेश राऊत मानद डॉक्टर पदवीने सन्मानित



प्रतिनिधी
■ पालघर

पालघर तालुक्यातील दातिवरे या गावातील सामाजिक कार्यकर्ते ॲड नीलेश रमेश राऊत यांच्या सामाजिक व शैक्षणिक विविध क्षेत्रातील कार्यासाठी वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी अमेरिका या अभिमत विद्यापीठाच्या वतीने मानद डॉक्टर पदवी देऊन दिल्ली येथे मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. ॲड.निलेश राऊत गेली २७/२८ वर्ष पालघर ,डहाणू,वसई तालुक्यात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून आदिवासी ,मच्छीमार,शेतकरी,गरीब,गरजू , तरुणांच्या शिक्षण,रोजगारासाठी नेहमी प्रयत्न करत असतात.महिला सबलीकरणासाठी देखील काम करतात.अनेक गावामध्ये स्थानिक लोकप्रतिनीचयाच्या माध्यमातून अनेक विकासकामांचे पाठपुरावा करून कामे पूर्ण केली आहेत. पालघर तालुक्यातील अंबाडे, एडवण, वेडी या गावांना पर्यटन विकास दर्जा मिळवून देण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.तसेच त्या भागातील अनेक पर्यटन स्थळांच्या विकासात महत्वाचा सहभाग घेतला आहे.आदिवासी भगिनी ना स्वयंरोजगार निर्मिती साठी न्युक्लिअस योजना असेन किंवा युवा बेरोजगारांना विविध शासकीय कर्ज योजना,स्वयंरोजगार योजना राबविण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन आणि लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.दलीत वस्ती मध्ये विकास कामांचा सतत पाठपुरावा करून विकास कामना गती दिली आहे. रोजगार मेळावे,बचतगटांचे मेळावे आयोजित करणे,विविध स्पर्धांच्या आयोजनात भाग घेणे,वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे.आरोग्य शिबिराचे आयोजन करणे ,याच बरोबर अनेक सामाजिक आंदोलनांमध्ये देखील सहभाग घेतला आहे.अशी अनेक कामे त्यांनी केली आहेत.आणि करीत आहेत. सामाजिक,राजकीय कार्यकर्ता ते पत्रकार,वकील,उत्तम कवी,लेखक,पत्रकार,सूत्रसंचालक,अभ्यासू वक्ता,गायक अशी अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेत भारतातल्या वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी समितीच्या वतीने त्यांची निवड करण्यात आली.अमेरिकेतील प्रतिष्ठित वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी यांच्या वतीने मानद डॉक्टर पदवी दिल्ली येथील द गौअरस सरोवर पंचतारांकित हॉटेल मध्ये आयोजित देश - विदेशातील नामवंत मान्यवर तसेच श्रीलंका,भूतान,नेपाळ सह अन्य देशातील मान्यवरांना देखील या वेळी सन्मानित करण्यात आले. जेष्ठ अभिनेते श्री.अरबाज खान,पॅलेस्टाईन दूतावासाचे वाणिज्य दूत श्री. बसेन हेलिस, प्रा.डॉ.राजीव मिश्रा, डीन, गालगोटिस विद्यापीठ,ग्रेटर नोएडा,डॉ. रंगडीमा पाथीरागे,उच्च शिक्षण सल्लागार,वॉशिंग्टन डिजिटल युनिव्हर्सिटी, अमेरिका, डॉ.राजेश सोनार,केनेडी विद्यापीठ,प्रो. ललितकुमार सागर,कुलगुरू,वेंकटेश्वर मुक्त विद्यापीठ,डॉ. इंदर नेगी ,इथेरिया ग्लोबल विद्यापीठ,अमेरिका,पद्मश्री पुरस्कार सन्मानित जितेंद्र सिंग शांटी,आदी अनेक मान्यवरांचे हस्ते यावेळी ॲड.निलेश राऊत यांना मानद डॉक्टर पदवी देवून सन्मानित करण्यात आली.

# वसईत लावणी हंगाम पूर्ण

## मुसळधार पावसाने शेतकऱ्यांना दिलासा

प्रतिनिधी
■ वसई



वसई तालुक्यात यंदाचा लावणी हंगाम अखेर पूर्ण झाला आहे. जूनच्या सुरुवातीला दमदार हजेरी लावून पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या होत्या. मात्र, त्यानंतर जवळपास पंधरवडाभर पावसाने दडी मारल्याने लागवडीची गती मंदावली. जुलैच्या मध्यापर्यंत परिस्थिती चिंताजनक बनली होती आणि लावणी हंगाम ठप्प झाला होता.

मात्र, जुलैच्या अखेरीस आलेल्या मुसळधार सरींनी रखडलेली लावणी पुन्हा वेग पकडली. अवघ्या आठ-दहा दिवसांत शेतकऱ्यांनी जलद गतीने काम पूर्ण केले. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात वसईतील लावणी हंगाम पूर्णत्वास पोहोचला असून शेतकरी राजा आता गणेशोत्सवाच्या तयारीस मोकळा झाला आहे.भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पावसाचे प्रमाण समाधानकारक राहणार असल्याचे भाकीत केले होते. त्याप्रमाणे गेल्या वर्षीपेक्षा यंदा पावसाची स्थिती चांगली राहिली आहे. जरी काही काळ पावसाने पाठ फिरवली, तरी शेवटच्या टप्प्यातील पावसाच्या जोरदार आगमनाने शेतकऱ्यांचा दिलासा परतला. गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम असून हवामान विभागाने पुढील काही दिवसही चांगल्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार झाले असून यंदा भात उत्पादन समाधानकारक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आदिवासी महिलेचे आमरण उपोषण यशस्वी

# अखेर तीन दिवसांनी झोपडीत उजेड

प्रतिनिधी
■ वसई




वसई होळी दिघा चावडीवाडी येथील पिंकी कानन या आदिवासी महिलेने विजेच्या जोडणीसाठी जागतिक आदिवासी दिनापासून आमरण उपोषण सुरू केले होते. सलग तीन दिवस अन्न-पाण्याचा त्याग करून उपोषण करत असलेल्या पिंकी कानन यांच्या आंदोलनाला भारताचा मार्क्सवादी लेनिनवादी पक्ष (लाल बावटा) यांचा सक्रिय पाठिंबा मिळाला.

पत्रकारांनी या आंदोलनाची दखल घेतल्यानंतर आणि लाल बावटा पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रकरणाला गती मिळाली. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी पिंकी कानन यांची प्रकृती खालावल्याने परिस्थिती गंभीर झाली. यावेळी पक्षाने महावितरणविरोधात 'बत्ती गुल' आंदोलनाचा इशारा दिला.

त्यानंतर वसई पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मंडळ अधिकारी वसई, महावितरणचे अधिकारी तसेच लाल बावटा पक्षाचे शेकडो कार्यकर्ते थेट पिंकी कानन यांच्या घरी पोहोचले आणि विजेची

> "तीन दिवस उपोषण केल्यानंतर आज माझ्या घरात लाईट आली. तहसीलदार आणि पोलिसांच्या मदतीने हा विषय सुटला, मात्र यामागे लाल बावटा पक्षाच्या लोकांनी दिवस-रात्र लढून मला न्याय मिळवून दिला.
>
> **पिंकी कानन - उपोषणकर्ते महिला**

### पश्चिम रेल्वेवरील लोकल सेवा विस्कळीत

**मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील विरार, वांद्रे येथे तांत्रिक बिघाड झाल्याने लोकल सेवा विस्कळीत झाली. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सकाळपासून दोन तांत्रिक बिघाडाच्या घटना घडल्याने प्रवाशांचे नियोजन बिघडले. विरार येथे सोमवारी सकाळी १०.४५ वाजता पॉईंटमध्ये बिघाड झाल्याने लोकल सेवा खोळंबली. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी पोहचून त्यांनी दुरुस्तीची कामे हाती घेतली. त्यानंतर तब्बल सकाळी ११.४० वाजता पॉईंटमधील बिघाड दुरुस्त करण्यात पश्चिम रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यश आले. सुमारे एका तास पश्चिम रेल्वेवरील लोकल उशिराने धावल्या.

# मनसेतर्फे "उद्योगावर बोलू काही" विशेष उपक्रमाचे आयोजन

## मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त मार्गदर्शन कार्यक्रम




प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुंबईतील मुलुंड पश्चिम येथील सचखंड दरबार हॉल येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने "उद्योगावर बोलू काही" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी अनेक तरुण-तरुणी या मार्गदर्शन शिबिराला उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन मनसे शाखा अध्यक्ष संदीप वरे आणि सहकार सेनेचे उपाध्यक्ष वैभव भोर यांनी केले होते. या कार्यक्रमास सॉफ्ट स्किल प्रशिक्षक प्रकाश मोहिते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, मनसे उपाध्यक्ष सत्यवान दळवी, सहकार सेनेचे प्रदेश सरचिटणीस विजय जाधव, विभाग अध्यक्ष राजेश चव्हाण, सहकार सेनेच्या प्रदेश सरचिटणीस अनिषा ताई माजगावकर, माजी नगरसेविका वैष्णवी ताई सरफरे, माजी नगरसेविका प्रियंका शृंगारे, कांदिवली विभाग अध्यक्ष आणि सहकार सेनेचे उपाध्यक्ष महेश फरकाशे, सायली दळवी, अनिल जोगळेकर,जयश्रीताई भिंताडे, राजेंद्र काळे, मनावर शेख, सुधीर पवार, संजय धावरे, संतोष कदम, संजय आडारकर, जयंत पाटील,महेश धामापूरकर,प्रसाद शेट्टे, दिनकर शिंदे, दिनेश साळवी,महिला उपविभाग अध्यक्ष कल्पना राणे, शाखा अध्यक्ष विमल लोखंडे, राकेश परदेशी, हितेश गुरव आदी उपस्थित होते.

# जव्हार येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न

प्रतिनिधी
■ पालघर



जिल्ह्यातील आदिवासी बहुल जव्हार तालुक्यातील नागरिकांना आता न्याय मिळविण्यासाठी लांब प्रवास करावा लागणार नाही. अत्याधुनिक व सुसज्ज अशा नव्या न्यायालय भवनाचे लोकार्पण करण्यात आले असून आदिवासी आणि दुर्गम भागातील न्यायालयीन प्रक्रियेच्या वेगवान पर्वाची सुरुवात झाली असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी केले.

आज विधी क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या लोकार्पण सोहळयास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती सेठना, ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल, आ. हरिश्चंद्र भोये, पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, राजे महेंद्रसिंग मुकणे ,जव्हार तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रसन्न भोईर, जव्हारच्या दिवाणी न्यायाधीश माया मथुरे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या लोकार्पणामुळे जव्हार व आसपासच्या ग्रामीण भागात न्यायालयीन प्रक्रियेच्या सोयी-सुविधांचा दर्जा मोठ्या प्रमाणात उंचावला असून, आदिवासी भागात न्यायव्यवस्थेच्या नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे समाधान न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ग्रामीण व आदिवासी भागातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ होणार मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे ग्रामीण व आदिवासी बहुल भागात न्यायसेवा अधिक सुलभ व प्रभावी करण्याच्या उद्देशाने जव्हार येथे नव्याने उभारलेल्या भव्य व सुसज्ज न्यायालय भवनाचे लोकार्पण करण्यात आले असल्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील न्यायालयीन प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी केले. नवीन न्यायालय भवनात प्रशस्त न्यायालयीन कक्ष, वकील कक्ष, साक्षीदारांसाठी स्वतंत्र प्रतीक्षागृह, नोंदणी व अभिलेख व्यवस्थेसाठी अत्याधुनिक कार्यालये, तसेच दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इमारतीच्या बांधकामात पर्यावरणपूरक व ऊर्जा बचतीच्या संकल्पनांचा अवलंब करण्यात आला असल्याचे न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी सांगितले. ग्रामीण भागात न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे ही काळाची गरज असून "न्यायालयाच्या नव्या इमारतीमुळे केवळ प्रलंबित खटल्यांच्या निवारणाला गती मिळणार नाही, तर नागरिकांना आपल्या हक्कासाठी न्यायालयापर्यंत पोहोचणे सोपे होईल तसेच, न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता, वेगवान निर्णयप्रक्रिया आणि सर्वसामान्यांचा विश्वास वृद्धिंगत करणे या उद्दिष्टांसाठी सर्व संबंधितांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहनही न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांनी केले.

**PUBLIC NOTICE**

Public Notice is hereby given that **Manjur Makbul Khan** (DOB 17/04/2006) son of Makbul Rafik Khan and Shahjahan Makbul Khan, currently living at address Room No. 226, Zakir Hussain Nagar, Nr. Imam bada, GM Link Rd., Govandi, Mumbai - 400043. I Shahjahan Khan have since applied for his **Birth Certificate** at Tehsildar Off., Kurla Mulund, Mumbai I hereby legally invite claims from any /all having any objections / claims **within 15 days** from the date of publication of this notice with supporting documents. If not, thereafter all objections / claims will be considered null & void.
Date: **09 August 2025**
Sd/-
**Mr. Shahjahan Makbul Khan**
Call - **7506121931**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 52
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ५२
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## ख्यातनाम शिल्पकार चंद्रजीत यादव यांचे अल्पशा आजाराने निधन

**मुंबई:-** बॉम्बे आर्ट सोसायटीचे सेक्रेटरी, ख्यातनाम शिल्पकार चंद्रजित यादव (61) यांचे रविवार दिनांक 10 ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.सोमवार दिनांक 11 कांदिवली डहाणूकर वाडी हिंदू स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यां प्रसंगी महाराष्ट्र शासन कला संचालक किशोर इंगळे, नामवंत चित्रकार वासुदेव कामात,सुहास बहुलकर, बॉम्बे आर्ट सोसायटीचे पदाधिकारी शिल्पकार अजिंक्य चौलकरसह,अनेक पदाधिकारी जे जे स्कुल ऑफ आर्ट चे अनेक कलावंत उपस्थित होते. कांदिवली चारकोप सुरभी सोसायटीत राहात असलेले ख्यातनाम शिल्पकार चंद्रजीत यादव गेले काही महिने आजारा शी लढत होते. रविवार दिनांक 10 ऑगस्ट रोजी, अचानक तब्येत बिघडल्याने, उपचारासाठी दवाखान्यात दाखल झाले. उपचारा दरम्यान त्यांचे निधन झाले.1982 बॅच चे जे जे स्कुल ऑफ आर्ट चे विध्यार्थी आणि बॉम्बे आर्ट सोसायटीचे 10 वर्ष सचिव पदाची उत्तम जबाबदारी यादव यांनी पार पाडली.मन मिळावू, नवीन विध्यार्थ्यांना मार्गदर्शक, दिलदार व्यक्तिमत्व, मदतीला नेहमीच पुढाकार घेणाऱ्या चंद्रजीत यादव यांच्या निधनाने शिल्पकार, चित्रकार आणि कलावंतामध्ये दुःखाचे वातावरण पसरले आहे.



# अभिनेते किशोर कदम यांची पुनर्विकास योजनेत फसवणूक? राहतं घर धोक्यात

## मुख्यमंत्र्यांकडे मागितली मदत

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रसिद्ध अभिनेते आणि कवी सौमित्र म्हणून ओळखले जाणारे किशोर कदम यांनी आपल्या अंधेरीतील राहत्या सोसायटीत सुरू असलेल्या पुनर्विकासाच्या प्रक्रियेत मोठा घोटाळा होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. बिल्डर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट आणि सोसायटी कमिटीने संगनमताने या सोसायटीतील सभासदांची फसवणूक करून त्यांची इमारत चक्क SRA/स्लम योजनेअंतर्गत विकसित करण्याचा घाट घातला आहे. या अन्यायाविरोधात त्यांनी थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्रातील जनतेला मदतीचे भावनिक आवाहन केले आहे.

किशोर कदम हे अंधेरी पूर्व येथील चाकाला परिसरातील 'अंधेरी हवा महल' या सोसायटीत गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. त्यांच्या सोसायटीमध्ये पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू असून, यात मोठी फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. कदम यांच्या मते, सोसायटी कमिटीने बिल्डर आणि पीएमसीच्या दबावाखाली येऊन सभासदांची दिशाभूल केली आहे. अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेली ही इमारत DCPR 33(11) आणि 33(12)B या नियमांनुसार, म्हणजेच SRA (झोपडपट्टी पुनर्वसन) योजनेअंतर्गत विकसित केली जात असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस आली आहे.

कदम यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, "कमिटी चौकस नसेल आणि बिल्डरच्या चुकीच्या प्रभावाखाली असेल, तर सामान्य माणसांची राहती घरे एखाद्या ट्रान्झिट कॅम्पसारखी होण्याची भीती असते. आमच्या सोसायटीत मूर्खांच्या बहुमताचा गैरफायदा घेतला जात आहे.""मी महाराष्ट्रातल्या तमाम रसिक जनतेला एका कलावंताचे घर वाचवण्याचे आवाहन करीत आहे," या शब्दांत त्यांनी आपली व्यथा मांडली आहे. किशोर कदम यांच्या या आवाहनामुळे मुंबईतील पुनर्विकासाच्या प्रक्रियेत सामान्य माणसाची होणारी ससेहोलपट पुन्हा एकदा समोर आली आहे.



**महत्वाची कागदपत्रे लपवली**

या प्रक्रियेतील त्रुटींवर कायद्याच्या चौकटीत राहून प्रश्न विचारल्यामुळे आपल्याला जाणूनबुजून लक्ष्य केले जात असल्याचे कदम यांनी म्हटले आहे. त्यांच्यासोबत इतर २३ सभासदांची घरेही धोक्यात आली आहेत. त्यांनी आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचताना काही गंभीर मुद्दे मांडले: कायद्याने प्रश्न विचारल्यामुळे त्यांना वगळून सोसायटीचा एक वेगळा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आला. पुनर्विकासासंबंधी महत्त्वाची कागदपत्रे आणि माहिती त्यांच्यापासून लपवली जात असून ते पुनर्विकासाच्या विरोधात असल्याचा खोटा प्रचार करून त्यांना इतर सभासदांपासून एकटे पाडले जात आहे. असाही आरोप केला आहे

किशोर कदम यांनी या प्रकाराला एक प्रकारची 'शहरी अॅट्रॉसिटी' म्हटले आहे, ज्यासाठी कायद्यात कोणतीही ठोस तरतूद नाही. बिल्डर आणि पीएमसीच्या प्रचंड आर्थिक ताकदीसमोर सामान्य माणसाला वर्षानुवर्षे हतबलपणे लढावे लागते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

गेली ३०-३५ वर्षे मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या आणि कवी सौमित्र म्हणून महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचलेल्या या कलावंताने अखेर सरकारकडे न्यायाची मागणी केली आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, तसेच सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष घालण्याची कळकळीची विनंती केली आहे.

# दहीहंडीचा सराव करताना 11 वर्षीय गोविंदाचा सहाव्या थरावरून पडून मृत्यू

प्रतिनिधी
■ मुंबई

दहीहंडीचा सराव सुरू असताना ६ व्या थरावरून कोसळून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. दहिसरच्या केतकीपाडा येथे रविवारी रात्री ही दुर्घटना घडली. तो अल्पवयीन गोविंदा नवतरुण मित्र मंडळ पथकाचा सदस्य होता. याप्रकरणी दहिसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तरुणाईच्या सळसळत्या उत्साहाने भरलेला दहीहंडी उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. 'ढाक्कुमाक्कुम ढाक्कुमाक्कुम', 'गोविंदा रे गोपाळा', 'मच गया शोर सारी नगरी रे' या गाण्यांचे सूर कानी पडू लागले आहेत. १६ ऑगस्ट होणाऱ्या दहीहंडी उत्सवाची मुंबईत जोरदार तयारी सुरू आहे. मुंबईसह राज्यांत ठिकठिकाणची गोविंदा पथके रात्रीचा जागर करून मानवी मनोरे रचण्याचा सराव करीत आहेत. आगामी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लाखो रुपयांच्या बक्षिसांची खैरात करून वर्चस्वाची हंडी फोडण्यासाठी राजकीय पक्षही मैदानात उतरले आहेत. त्यामुळे उंच थर रचण्याची स्पर्धा वाढू लागली आहे. मात्र या उंच थराच्या स्पर्धेत एका चिमुकल्याला आपला जीव गमवावा लागला आहे.

### दहिसरवर शोककळा

दहिसरच्या केतकीपाडा येथे रविवारी रात्री नेहमीप्रमाणे नवतरूण मित्रमंडळाचे पथक गोविंदाचा सराव करत होते. या पथकात महेश रमेश जाधव (११) या चिमुकल्या गोविंदाचा समावेश होता. या पथकाने ६ थर लावले होते. चिमुकला महेश ६ व्या थरावर चढला होता. रात्री पावणे दहाच्या सुमारास तो ६ व्या थरावरून कोसळला आणि त्याला झेलण्याच्या आत तो जमिनीवर पडला. त्याला उपचारासाठी दहिसर पूर्वेच्या प्रगती रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे मोठी शोककळा पसरली आहे.

# ठाकरेंच्या पॅनलला दरेकर, लाड, राणे, पावसकर यांचे आव्हान

## बेस्टच्या पतपेढीची निवडणूक यंदा गाजणार

प्रतिनिधी
■ मुंबई

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.च्या पंचवार्षिक निवडणूकीत यंदा राजकारण रंगणार आहे. आधीच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे बंधूंनी एकत्र येत एक पॅनल तयार केलेले असताना आता ठाकरे बंधूंना आव्हान देण्यासाठी महायुतीनेही मोर्चेबांधणी केली आहे. आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, मंत्री नितेश राणे आणि माजी आमदार किरण पावसकर यांनी एकत्र येऊन एक पॅनल तयार केले आहे. त्यामुळे यंदा ही निवडणूक चुरशीची होणार आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसली तरी सर्व पातळ्यांवर या राजकारणातील युती आणि आघाड्यांना सुरुवात झाली आहे. त्याचाच प्रत्यय बेस्ट उपक्रमाच्या कामगार पतपेढी निवडणुकीतही येऊ लागला आहे. बेस्ट उपक्रमाच्या कामगारांच्या पतपेढीची निवडणूक सोमवार, दि. १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. या निवडणुकीत ज्या पॅनलची सत्ता येते त्या कामगार संघटना बेस्ट उपक्रमात बलवान समजल्या जातात. त्यामुळे या निवडणूकीला महत्व आहे. महाराष्ट्रात सद्या ठाकरे ब्रँड चर्चेत आहे. बेस्टचे बहुतांश कामगार,पुढारी, युनियनचे पदाधिकारी बेस्टच्या बाहेर शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक म्हणून परिचित आहेत. कित्येक कर्मचारी हे दोन्ही पक्षाचे पदाधिकारी आहेत. शिवसेना (ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन्ही पक्ष या निवडणूकीच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येणार असून दोन्हीकडच्या उमेदवारांचे एकच उत्कर्ष पॅनेल या निवडणूकीसाठी उतरवण्यात आले आहे. ठाकरे बंधूंच्या पॅनेलची घोषणा झाल्यानंतर महायुतीनेही आपले दंड थोपटले आहेत. आमदार प्रविण दरेकर व प्रसाद लाड यांची श्रमिक उत्कर्ष सभा, मत्सव्यवसाय मंत्री नितेश राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना आणि शिवसेना(शिंदे) पक्षाचे माजी आमदार किरण पावसकर यांची राष्ट्रीय कर्मचारी सेना यांनी एकत्र येऊन सहकार समृध्दी पॅनलची निर्मिती केली असल्याची माहिती समर्थ बेस्ट कामगार सेनेचे विलास पवार यांनी दिली.

**पाच संघटना एकत्र**

महायुतीमधील या नेत्यांच्या तीन संघटनांना बेस्टमधील आणखी दोन संघटनांनी साथ दिली आहे. त्यात महेंद्र साळवे यांची बेस्ट एसी/एसटी/व्हीजेएनटी वेल्फेअर असोसिएशन व दिवंगत मनोज संसारे यांचा बहुजन संघ अशा दोन संघटनांचाही महायुतीच्या पॅनेलमध्ये समावेश आहे.

—नारळाचं झाड पडून मुंबईकर तरुणाचा मृत्यू—

# 13 वर्षांनी जाधव कुटुंबाला न्याय

## 20 लाख देण्याचे सोसायटीला आदेश

प्रतिनिधी
■ मुंबई

हाऊसिंग सोसायटीच्या आवारातील जीर्ण नारळाचे झाड अंगावर पडून तरुणाचे प्राण गेले, याबद्दल मुंबई शहर दिवाणी न्यायालयाने सोसायटीवर ठपका ठेवला आहे. त्याचबरोबर पीडित कुटुंबाला व्याजासह सुमारे २० लाख रुपयांची भरपाई देण्याचा आदेशही न्यायालयाने त्या सोसायटीला दिला आहे.

मुंबईतील कुर्ला येथे राहणारा आणि खासगी कंपनीत नोकरीला असलेला रोहित जाधव हा १८ जुलै २०१२ रोजी आपल्या मित्रासोबत अंधेरी स्थानकाच्या दिशेने जात होता. त्यावेळी या सोसायटीच्या जवळून जाताना अचानक जीर्ण नारळाचे झाड त्याच्या अंगावर कोसळले. त्यात जबर जखमी झालेल्या रोहितला होली स्पिरिट रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, २६ जुलै २०१२ रोजी तो दगावला होता.

या घटनेनंतर रोहितचे वडील भगवान जाधव यांनी अॅड. एच. के. होळंबे पाटील यांच्यामार्फत सन २०१३ मध्ये सत्यदर्शन हाऊसिंग सोसायटीविरोधात दावा दाखल केला होता. याविषयीच्या सुनावणीअंती न्यायाधीश राजेंद्र लोखंडे यांनी नुकताच हा निर्णय दिला.

सोसायटीच्या वकिलांचा युक्तिवाद फेटाळला
'हे झाड तोडण्याविषयी परवानगी देण्यास मुंबई महापालिकेने विलंब केला. त्यामुळे रोहितच्या मृत्यूला सोसायटी जबाबदार नाही. शिवाय जोरदार पाऊस व वाऱ्याने ती घटना घडली. त्यामुळे तो प्रकार देवाची कृती यामध्ये मोडतो. तसेच, झाड कापण्यास बाहेरच्या दुकानदारांचा विरोध होता, असा युक्तिवाद सोसायटीतर्फे करण्यात आला. मात्र, सर्व बाजू तपासल्यानंतर न्यायाधीशांनी सोसायटीचा युक्तिवाद फेटाळला.

# चेंबूर येथील बाटा शोरूमला भीषण आग, आगीत शोरुममधील वस्तूंचे मोठे नुकसान

■ मुंबई

काल चेंबूर येथील शीव आशिष इमारतीतील २ हजार चौरस फूट जागेत असलेल्या बाटाच्या दुकानाला सोमवारी पहाटे साडेचारच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्घटनेत शोरुममधील चपला, बुटांसह अन्य वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे. प्रयत्न केले. यावेळी, अदानी इलेक्ट्रिसिटी व संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचारी, पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, शीव आशिष या औद्योगिक इमारतीतील तळमजल्यावरील बाटा शोरुममध्ये आग लागली होती. काही वेळातच आग तळघरापर्यंत पसरली. आगीची वाढती तीव्रता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने आगीला वर्दी क्रमांक १ असल्याचे घोषित केले. दरम्यान, तब्बल तीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी आग विझविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. आगीमुळे शोरुममधील विद्युत यंत्रणा, विजेच्या तारा, चप्पल - बुट, बॉक्स, कागदपत्रे आदी वस्तू जळून खाक झाल्या. तर आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आग आटोक्यात आल्यानंतर घटनास्थळी अग्निशमन दलातर्फे कुलिंग ऑपरेशन करण्यात आले.

# माहुलमधील घरे आता महानगरपालिकेचे निवृत्त कर्मचारीही करु शकतात खरेदी

## सदनिका विक्रीच्या अत्यल्प प्रतिसादामुळे पालिकेचा निर्णय

प्रतिनिधी
■ मुंबई

माहुल येथील घरांच्या विक्रीसाठी मुंबई महापालिकेने काही निकषांत बदल आणि मुदतवाढ केल्यानंतरही पालिका कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद कमी मिळाला, यामुळे आता येथील घरे निवृत्ती कर्मचाऱ्यांसाठी विक्री करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. लवकरच पालिका आयुक्तांची मंजुरी मिळाल्याने याची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

माहुलमधील सदनिकांमध्ये प्रकल्पबाधित राहायला जात नसल्याने तब्बल १३ हजारांवर घरे रिक्त आहेत. ही घरे पालिका कर्मचाऱ्यांना १२ लाख ६० हजार रुपये किमतीत मालकी तत्त्वावर विक्री केली जात आहे. गेल्या १५ मार्चपासून एकूण ९०९८ घरांसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. १५ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत फक्त २३१ अर्ज आले. अल्प प्रतिसादामुळे १५ मेपर्यंत मुदत वाढवण्यात आली. शिवाय निकषांतही शिथिलता देण्यात आली. मात्र दोन महिन्यांनंतरही फक्त ३३० अर्ज आले.या अर्जदारांनी अनामत रक्कम आणि नियमानुसार घराची प्रक्रिया केली. सोडत काढून २१ जून रोजी या घरांचे वाटप केली जाणार होते. मात्र ३३० पैकी सुमारे ५० कर्मचाऱ्यांनीच घरांची रक्कम जमा केली. त्यामुळे पुन्हा ३० जुलैपर्यंत मुदत वाढवली. मात्र २४८ अर्जदारांनी ३३० घरांसाठी नोंदणी केली.यात एका अर्जदाराने दोन घरांसाठी अर्ज केले. त्यामुळे ३३० घरांची विक्री केली जाणार होती. घराचे वाटप करण्यासाठी ३० जून अनामत रक्कम भरण्याची अंतिम मुदत होती. मात्र २४८ अर्जदारांपैकी फक्त 53 अर्जदारांनीच घरांची अनामत रक्कम भरली. त्यामुळे उर्वरित 195 अर्जदारांनी ही घरे नाकारली आहेत.सुमारे 8768 घरे पडूनमहापालिका प्रशासनाने सर्व प्रयत्न करूनसुध्दा कर्मचाऱ्यांनी घर खरेदीकडे पाठ फिरवली आहे. घरांसाठी अर्ज करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांनी ही घरे नाकारली. त्यामुळे सुमारे ८७६८ निम्म्याहून अधिक घरे पडून आहेत.

अल्प प्रतिसादामुळे या घरांचे करायचे काय हा पेच पालिकेसमोर कायम राहिला आहे. श्रेणी एक अधिकारी वगळून इतर पालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी घर खरेदीची संधी देण्यात आली होती. मात्र या वर्गातील कर्मचाऱ्यांनी अल्प प्रतिसाद मिळाल्याने आता पुन्हा निकषात बदल करून पालिकेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांना घरांची विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

अर्जदार/ वादी

उपनिबंधक जन्ममृत्यू व विवाह
ए /बी विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका सामनेवाला/प्रतिवादी

ज्या अर्थी जन्ममृत्यू नोंदणी अभियान 1969 व भारताचे राज्यपत्र जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा 2023 मधील कलम 11 (3 ) अन्वये जन्माची मृत्यूची नोंद घेऊन जन्म नोंद /मृत्यू प्रमाणपत्र निगमित करण्यासाठी संबंधित प्राधिकरणास आदेश होणे बाबत इरफान अत्तरवाला यांनी या न्यायालयात अर्ज केला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कडे शासन निर्णय क्रमांक जमुना 2525/ई. आ. 991181/प्र. क्र.22/कु. क./दि. 12/03/2025 अन्वये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्याअर्थी सर्व नागरिकांस कळविण्यात येते की अर्जदार /वादी यांनी मोहम्मद इस्माईल अत्तरवाला यांचा मृत्यु दिनांक 07.06.2017 रोजी पत्ता : 903/9 वा मजला, क्रिस्टल रहमानिया टॉवर, निशान पाडा क्रॉस लेन, डोंगरी मुंबई या ठिकाणी झालेला आहे असा दावा केलेला आहे. परंतु सदरची जन्म नोंद मृत्यूनंतर संबंधित वॉर्ड मधील जन्म मृत्यू निबंध तथा वैद्यकीय आरोग्य आलेखात यांच्या कार्याद्यात करण्यात आलेली नाही सदरची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या जन्म नोंदणी अभिलेखात घेऊन जन्म मृत्यू निबंधक तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी जन्माचे प्रमाणपत्र निगमित करणे बाबत कोणाचेही संबंध असल्यास आक्षेप असल्यास किंवा काही माहिती पुरवायची असल्यास त्यांनी या जाहीर नोटिसीच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई शहर संजय गांधी योजना शाखा खोली क्रमांक 234, जुने जकात घर दुसरा मजला शहीद भगतसिंग मार्ग फोर्ट मुंबई : 400001 येथे हजर राहून आपली लेखी स्वरूपात आक्षेप / म्हणणे सादर करावे. आणखी असेही कळविण्यात येते की जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणी आक्षेप / म्हणणे साधन न केल्यास सदरहू न्यायालयाद्वारे उचित कार्यवाही करून उपरोक्त अर्जदार यांच्या दावेनुसार नोंदणी करणेबाबत संबंधित जन्म मृत्यू निबंधक यांना आदेश निगरमित करण्यात येईल अथवा निर्णय देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

महानिर्मिती

## भु. औ. वि. कें.

ई-निविदा सूचना क्र. ८५/२०२५-२६

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा / कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत / बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ३०००० ६०६८३ / कोळसा हाताळणी विभाग २१० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील कोळसा हाताळणी विभाग २१० मे. वॅ.येथे सुरक्षिततेच्या उद्देशाने बंकर हाउस रूफ कंटेनमेंट सिस्टम पुरवठा करण्याचे आणि बसविण्याचे काम. | रु २,१८,१५,७२०/- / रु.२,२१,७००/- |
| २. | ३०००० ६०३०६ / कोळसा हाताळणी विभाग २१० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कोळसा हाताळणी प्रकल्प २१० मेगावॅट मधील दुय्यम क्रशर हाऊसमध्ये धूळ संग्राहक बसवणे आणि चालू करण्याचे काम. | रु.२,१६,००,०००/- / रु.२,१९,५०० /- |
| ३. | ३०००० ६०६७९ / कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे. वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे कोळसा हाताळणी विभाग २x५०० मेगावॅट मधील कार्यालयाच्या सुधारणा आणि नूतनीकरणासाठी कामाचा करार. | रु.४६,९०,०००/- / रु.५०,४०० /- |
| ४. | ३०००० ६०६३३ / स्थापत्य विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील राख बंधारा परिसरात स्ट्रक्चरल स्टील वॉच टॉवर (०४ नंबर) बांधण्याचे आणि उभारण्याचे काम. | रु.३१,८६,६१३/- / रु.३५,४००/- |
| ५. | ३०००० ६०५९५ / नियंत्रण आणि उपकरणे २x५०० मे.वॅ. | भु.औ.वि.केंद्र युनिट ५, २x५०० मेगावॅटच्या एओएच दरम्यान आवश्यक असलेल्या एचपी बायपास सिस्टम स्पेअर्सची खरेदी. | रु.२९,२६,७५०/- / रु.७२,४००/- |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या.
https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.),
भु. औ. वि. कें., दीपनगर.

# आ. लांडे आयोजित भव्य कावड यात्रेला हजारो भाविकांचा उस्फुर्त प्रतिसाद



प्रतिनिधी
■ मुंबई

सालाबादप्रमाणे श्रावण महिन्यात काढण्यात येणाऱ्या चांदिवलीतील कावड यात्रेला हिंदू बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या कावड यात्रेत हर हर महादेव, बम बम बोले गजर दुमदूमला आहे. शिवसेना चांदिवली विधानसभा क्षेत्राच्या वतीने आमदार दिलीप (मामा) लांडे यांच्या नेतृत्वाखाली, हिंदू संस्कृती व परंपरा जोपासण्यासाठी,भगवान शंकराच्या जयघोषात व भगव्या वातावरणात, हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या डी.जे.च्या गाण्याच्या तालावर, फटाक्यांच्या अतिषबाजीत रविवार दिनांक १० ऑगस्ट रोजी शितल तलाव ते काजूपाडा पाईप लाईन मार्गे श्री शंभो महादेव मंदिर पर्यंत भव्य कावड यात्रा आयोजित करण्यात आली होती.

श्रावण महिन्यात सालाबाद प्रमाणे या वर्षी आमदार दिलीप लांडे यांच्या माध्यमातून कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कावड यात्रेला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या कावडयात्रेत हजारो उत्तर भारतीय महिला भगवी साडी परिधान करून श्री शंभो महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यासाठी घागर/कलश घेऊन सहभागी झाल्या तसेच शेकडो पुरुष हे भगवे कुर्ते परिधान करून कावड घेऊन आले होते. या कावडयात्रे दरम्यान हिंदू देव-देवतांचे भगवान शंकर, श्रीराम, हनुमान आदी मुर्त्यासह चलतचित्र देखावा प्रदर्शित करण्यात आले. या कावडयात्रेसाठी खास तीर्थक्षेत्र काशी वरून पवित्र जल आणून श्री शंभो महादेव महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. भगवी ताकद, भगवी शक्ती व भक्ती एकत्रित करून भगवी ताकद महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी पर्यायाने महाराष्ट्रात असलेले हिंदुत्ववादी शिवसेना भाजप सरकारच्या पाठीशी उभी करण्याच्या दृष्टीने कावडयात्रेचे आयोजन करण्यात आले असे प्रतिपादन आमदार, विभागप्रमुख दिलीप लांडे यांनी केले. भगवान श्री शंभो महादेवाच्या पिंडीवर तीर्थक्षेत्र काशीच्या जलाने अभिषेक करून चांदिवलीचा विकास करण्यासाठी ताकद मिळो अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी माजी नगरसेविका शैला लांडे, युवासैनिक प्रणव लांडे, प्रयाग लांडे, उत्तर भारतीय संघ चांदिवलीचे पदाधिकारी अध्यक्ष रामप्रसिद्ध दुबे, सेक्रेटरी भास्कर सिंह, महिला तालुका अध्यक्ष सरिता मिश्रा आदीसह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

REMSONS INDUSTRIES LIMITED

सीआयएन: एल५११९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
नोंदणी. कार्यालय: ४०१, ४ था मजला, ग्लॅडोलिया हनुमान रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.
दूर. क्र.: ०२२-२६२६२१००, २६११२२३६८, ई – मेल आयडी: corporate@remsons.com, संकेतस्थळ: www.remsons.com

## ३० जून २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अ-लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

रु. लाखामध्ये (ईपीएस वगळता)

| तपशिल | एकमेव | | | | एकत्रिकृत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष |
| | ३०.०६. २०२५ (अलेखापरीक्षित) | ३१.०३. २०२५ (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२४ (अलेखापरीक्षित) | ३१.०३. २०२५ (लेखापरीक्षित) | ३०.०६. २०२५ (अलेखापरीक्षित) | ३१.०३. २०२५ (लेखापरीक्षित) | ३०.०६. २०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.०३. २०२५ (लेखापरीक्षित) |
| कार्यामधून /एकूण उत्पन्न (निव्वळ) | ६,७७५.६५ | ६,५८७.४७ | ६,२०४.२६ | २८,१९४.०४ | १०,०८०.६५ | १०,६९६.०० | ७,७१९.४१ | ३७,९८५६९ |
| कर पूर्व सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा), अपवादात्मक आणि / किंवा अपवादात्मक बाबी | २७३.५० | २१२.६३ | ३०८.८५ | १,४११.२४ | ६०६.६९ | ८४४.९१ | २७८.३० | २,२५५.४५ |
| कर पूर्व कालावधीसाठी अपवादात्मक बाबी पश्चात सामान्य कार्यामधून निव्वळ नफा/ (तोटा) | २७३.५० | २१२.६३ | ३०८.८५ | १,१०७.८४ | ४७९.८६ | ६५५.१३ | २६८.५४ | १,६९६.२४ |
| कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक बाबी पश्चात ) | २०२.१८ | १५८.४५ | २२७.२१ | १,१०७.८४ | ४७९.८६ | ६५५.१३ | २६८.५४ | १,६९६.२४ |
| *कालावाधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात) आणि अन्य एकत्रित उत्पन्न (कर पश्चात)]" | १९८.९३ | १६३.३९ | (१०९.२६) | ७९२.८५ | ६२२.७७ | ५०७.१२ | ३४९.११ | १,५३९.३१ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (रु. २/- दर्शनी मूल्याचे) | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ | ६९७.५८ |
| राखीव (हिशोबाच्या गत वर्षाच्या ताळेबंदाच्या अनुसार पुंरामुल्यांकित राखीव) | ३१ मार्च २०२५ | | | १०५५६.८३ | | | | ११,८६३.५७ |
| " प्रति समभाग उत्पन्न (रु. २/- प्रत्येकीचे) - | | | | | | | | |
| १.मूळ : (रु.) | ०.५८ | ०.४५ | ०.६५ | ३.१८ | १.०४ | १.३१ | ०.७७ | ४.१२ |
| २. सौम्यीकृत: (रु.)" | ०.५८ | ०.४५ | ०.६५ | ३.१८ | १.०४ | १.३१ | ०.७७ | ४.१२ |

टिप:
१. वित्तिय निष्कर्षाचे लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १४ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये ते नोंदपटावर घेण्यात आले आहेत. वित्तिय निष्कर्ष कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ आणि अन्य लागू असलेल्या लेखा परीक्षण आणि धोरण अंतर्गत विहित करण्यात आलेल्या भारतीय लेखा मानांकन (इंड – एएस) च्या अनुषंगाने तयार करण्यात आला आहे.
२. ३० जून २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अ-लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा उपरोक्त हा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) तपशिलवार आराखडा आहे. संपलेल्या त्रैमासिकाच्या कालावधीसाठीचा पूर्ण आराखडा कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.remsons.com आणि बीएसई लि. म्हणजेच www.bseindia.com आणि नॅशनल स्टक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) वर उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: ११ ऑगस्ट २०२५

रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करीता
सही/-
कृष्णा केजरीवाल
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन – ००५१३७७७)

वाहतो तो झरा आणि थांबतं ते डबकं! डबक्यावर डास येतात आणि झऱ्यावर राजहंस!



- व. पु. काळे
प्रसिद्ध लेखक

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५

# तिचं माणसं, त्याच चुका...

आधी निसर्गाच्या व्यवस्थेत अनन्वित ढवळाढवळ करायची आणि मग नुकसान झाले की निसर्गालाच दोष द्यायचा, हे योग्य नाही. अलीकडेच उत्तरकाशीमध्ये ढगफुटीमुळे जी मोठी हानी झाली. अनेक घरे, दुकाने आणि रस्ते वाहून गेले. या घटनेत काही नागरिक बेपत्ता झाले. आपण विकासाच्या नावाखाली निसर्गाची करत असलेली हानी पाहता निसर्गाचा कोप म्हणजे काय असतो? निसर्ग किती रौद्ररुप धारण करतो यांचा अंदाज सर्वांना आला असेल. पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि निरोगी वातावरण सुनिश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. मुळातच पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची अनेक कारणे आहेत, ज्यामध्ये मुख्यत्वे प्रदूषण, जंगलतोड, जास्त लोकसंख्या, हवामान बदल आणि कचरा यांचा समावेश होतो. ही कारणे एकमेकांशी जोडलेली आहेत आणि त्यांच्यावर व्यवसाय, सरकार आणि व्यक्तींनी सामूहिक कृती करणे आवश्यक आहे. आज मानवजातीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे पर्यावरणाच्या ऱ्हासाचे कारण म्हणजे वाढते प्रदूषण, लोकसंख्या, जंगलतोड, वाळवंटीकरण, जे सर्व हवामान बदलाला कारणीभूत ठरते. भारताचा विचार केला, तर वनस्पती आणि जंगलांचा नाश, पाणी आणि वाऱ्यामुळे होणारी धूप, पाण्याचे बदलते प्रवाह, शहरीकरण आणि हवामान बदल ही जमिनीच्या ऱ्हासामागची मुख्य कारणं आहेत. नैसर्गिक आणि मानवी कारणांमुळे या गोष्टी घडू शकतात. एखाद्या ठिकाणी वनस्पतींचा विशेषतः घनदाट जंगलाचा ऱ्हास झाला की तिथल्या मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. अशा मातीतील आर्द्रता, ओलावा कमी झाल्यानं तिथे पुन्हा वनस्पती उगवण्याची किंवा बिया रुजण्याची क्षमता घटते. अशा मातीची पाणी आणि वाऱ्यामुळे धूप होण्याची शक्यता वाढते. गवताळ भागात गुरं चारणे, वणवे यांमुळे जमिनीच्या पाणी धरण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊन जमिनीची धूप होते. सध्या वाढत्या नागरकरणाचा फटका बसत आहे. शहरांत बांधकामासाठी जागा सपाट केली जाते, त्यामुळे अनेकदा पावसाच्या पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बदलतात. पाणी नव्या दिशेनं वाहतं, तेव्हा तिथे धूप होते. जे पाणी जाऊन नदीत मिळायचं ते इतरत्र कुठेतरी जातं, साठून राहते. त्यामुळे जमिनीचा पोत बदलू शकतो. तर जागतिक तापमानवाढीमुळे वाळवंट अधिक उष्ण आणि शुष्क होत आहेत. तसंच पावसाच्या प्रमाणात बदल होतो आहे. जिथे पाऊस कमी झाला आहे तिथे जमिन कोरडी पडते तर जिथे अतीवृष्टीचा धोका वाढला आहे, तिथे धूप होण्याची शक्यता वाढते. पाण्यामुळे होणारी धूप आणि वनस्पतींचा ऱ्हास ही जमिनीच्या ऱ्हासाची मुख्य कारणं आहेत. चिंतेची बाब म्हणजे अहवालानुसार देशातील वाळवंटीकरणात सर्वाधिक वाटा अनुक्रमे राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, लडाख, झारखंड, ओडिशा, मध्यप्रदेश, तेलंगाणा यांचा आहे. सध्या पर्यावरणाचा ऱ्हास हा चिंतेचा विषय बनला आहे. भारत आणि चीनची लोकसंख्या मर्यादा ओलांडेल, असं म्हटलं जातं. या मोठ्या लोकसंख्येला अन्न आणि ऊर्जा पुरवणं म्हणजे प्रदूषणात वाढ करणं, जंगलतोड करून शेती करणं, आदी सर्व पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या गोष्टींना पर्याय नाही. उत्क्रांती आणि पर्यावरण यासंबंधीचं संशोधन भूशास्त्राचं अध्ययन आणि काही काळ अध्यापन केल्यानंतर काही गोष्टी आपल्या लक्षात आल्या असं वाटू लागतं. ते तसं असेलच असं नाही. एक तर भूशास्त्राचा अभ्यास करताना पृथ्वीवरच्या प्राचीन वातावरणाची माहिती करून घ्यावी लागली. पृथ्वीच्या कोणत्याही भूभागातली नैसर्गिक परिस्थिती स्थिर नसते, तर ती सातत्याने बदलत असते. आज जिथं वाळवंट आहेत, तिथं एके काळी सुपीक जमीन होती. जिथं पर्वत आहेत तिथं सागर होते. माणूस पृथ्वीवर वावरायला लागल्यानंतर अनेक हिमयुगं आणि या हिमयुगांच्या दरम्यान खूप वाढलेलं तापमान मानवाने बघितलेलं आहे. या हिमयुगात आणि उष्ण काळात अनेक प्राणिजाती नष्ट झालेल्या मानवानं बघितल्या आहेत. तेव्हा, बदलतं हवामान, वाढतं तापमान या घटना आजच्या नाहीत आणि पूर्वीच्या घटनांना मानव निश्चितच जबाबदार नव्हता. सर्वसाधारणपणे निसर्गचक्रात एखादी प्राणिजात जेव्हा निसर्गाशी जुळवून घेते, तेव्हा ती नैसर्गिक संकटांमधून वाचते आणि टिकून राहते. हे जेव्हा त्या जातीच्या प्रजेची संख्या मर्यादित असते तेव्हाच शक्य होतं. जेव्हा एखाद्या भूभागात प्राण्यांच्या संख्येत वाढ होते तेव्हा ते आपापसात झगडू लागतात, आक्रमक बनतात आणि ही त्या प्राणिजातीच्या नाशाची सुरुवात असते. पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न खरंच पुरे पडणार आहेत का? जर ते पुरे पडणार नसतील, तर कशासाठी करायचे? आपल्या देशात आपण अनेक दिवस साजरे करतो. त्यात पर्यावरण दिवस सुद्धा नेहमी साजरा केला जातो. त्यावेळी अनेक जण भाषण देतात. बऱ्याच स्पर्धा होतात आणि त्याच दिवशी पर्यावरणाचं नुकसान करणाऱ्या अनेक घटना घडतात. पण हे सगळं का घडतं? यांचे उत्तर कोणाकडे नाही. जागतिक लोकसंख्या जसजशी वाढत आहे, तसतसा नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण हा देखील वाढत चालला आहे. नैसर्गिक परिसंस्थेवरील हा दबाव कमी करण्यासाठी शाश्वत लोकसंख्या व्यवस्थापन धोरणे अमलात आणणे महत्त्वाची आहेत. भावी पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा भागवण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता आपण वर्तमान काळातील गरजा पूर्ण करण्यासाठी आपण शाश्वत विकास पद्धतींकडे वळले पाहिजे. यामध्ये आपण अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर केला पाहिजे, ऊर्जा कार्यक्षमता सुधारवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे आणि शाश्वत शेती आणि वनीकरण पद्धतींचा अवलंब करणे यामध्ये समाविष्ट आहे. यासाठी पर्यावरणपूरक आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार अशा पायाभूत सुविधांची उभारणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्या पर्यावरणीय असुरक्षित परिसंस्था आणि प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी संवर्धनाचे प्रयत्न तीव्र केले पाहिजेत. विविध ठिकाणी संरक्षित क्षेत्रे आणि वन्यजीवांसाठी अभयारण्य स्थापन केल्याने जैवविविधता आणि नैसर्गिक अधिवासांचे जतन होण्यास खूप मदत होईल. वेळोवेळी वनांचे पुनर्वनीकरण आणि पाणथळ ठिकाणी पुनर्वसन करणे यासारख्या पुनरुज्जीवन प्रकल्पांमुळे खराब झालेल्या भागांचे पुनरुज्जीवन होण्यास मदत होईल, आणि यामुळे पर्यावरणीय संतुलन आणि लवचिकता वाढली जाईल. पर्यावरणविषयक जागरूकता वाढविण्याबरोबरच शाश्वत पद्धतींबद्दलच्या शिक्षणास देखील प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे. याद्वारे व्यक्तींना त्यांच्या कृतींच्या परिणामांबद्दल ज्ञान देणे आवश्यक आहे, आणि त्यांना त्यासाठी लागणारे व्यावहारिक उपायांची माहिती देऊन शिक्षित करणे हे महत्त्वाचे आहे इतके करून आपण त्यांना पर्यावरणविषयी जागृत आणि शिक्षित करू शकतो. शाळा, संस्था आणि पर्यावरणप्रेमी संस्थांनी पर्यावरण शिक्षणाला प्राधान्य दिले गेले पाहिजे आणि पर्यावरणपूरक वर्तनास त्यांनी प्रोत्साहीत केले पाहिजे. वाढलेली मानवी लोकसंख्या, अन्न आणि ऊर्जेची वाढती मागणी, बदलतं हवामान, ही मानवी वंशऱ्हासाची सुरुवात तर नाही ना? याचं कारण जेव्हा एखाद्या प्राणिजातीची संख्या वाजवीपेक्षा जास्त वाढते तेव्हा जगण्याची स्पर्धा तीव्र होते. त्या प्राणी जातीत आक्रमकता वाढते. आपापसात मारामाऱ्या सुरू होतात. आपल्यापुढे तशाही अन्न, पाणी आणि ऊर्जा यांच्या कमतरतेच्या समस्या आहेत. त्याचबरोबर ज्यांना या समस्या भेडसावतात त्यांच्याकडे अण्वस्त्रे आहेत. बदललेल्या हवामानामुळे ओले आणि सुके दुष्काळ वाढले, तर या समस्या आणखी तीव्र होतील.

# दाणा, पाणी आणि धर्म

## कबुतरांच्या पंखाखाली दडलेलं तर्कशास्त्र

**राजन पारकर**

**मित्रांनो,** धर्म, भावना आणि तर्क – हे तीन शब्द आजकाल एकाच वाक्यात ठेवले की, पंडितबुवांचे भुवई ताणतात, श्रद्धाळूंचा पारा चढतो आणि विज्ञानाचा तापमानमीटर फुटतो. जैन म्हणून मी कबुतरांना दाणे टाकणं हा परंपरेचा भाग मानतो. परंपरेच्या नावाखाली आपण कितीही दाणे पेरले तरी कबुतरांची संख्या कधी कमी होत नाही, उलट दाणा बघून ती गगनभरारी घेऊन वाढतात. हे पक्षी आपल्या चिमण्या, साळुंकी, बुलबुल यांना हद्दपार करून पंखांचा "गुंडराज" बसवतात.

आता कोणी म्हणेल– "दाणा नाही दिला तर हे बेचारे मरतील!" अहो, मग जंतू, विषाणू, बुरशी हेही बेचारेच ना? त्यांना मारणारे अँटिबायोटिक्स, अँटीव्हायरल, अँटीफंगल वापरताना कुठे जाते तुमची "अहिंसा"? की तिथे जीवहत्येला "औषधोपचार" असं पवित्र नाव लावून आपण झोपलो? कबुतरांचं काय, ते दाणा नाही मिळाला तर स्वतः अन्न शोधतील, संख्या नियंत्रणात राहील आणि निसर्गाचा समतोल टिकेल. पण नाही! आपल्या भावनांच्या




कारंज्यात तर्क बुडाला की मग रुग्णालयाच्या गच्च्यांवरही कबुतरखान्याची स्थापना होते. त्यांची विष्ठा, रोगजंतू आणि पंखांचा गजर हे सार्वजनिक आरोग्याचं वाजतं वाजवतात. आता खरी गंमत ऐका, एका जैन मुनिश्रींनी अलीकडे प्रवचनात सांगितलं की, "जिलेबी आणि दही खाऊ नका." अहो, ठीक आहे. पण पिण्याचं पाणी? महापालिकेचं पाणी शुद्ध करताना हजारो सूक्ष्मजीव, मासे यांना मारलं जातं. ते पाणी प्यायला मात्र कुणी हरकत घेत नाही. म्हणजे "जिलेबी-हत्या" मोठा पाप, पण "पाण्यातील नरसंहार" हा 'स्वच्छता' म्हणून धर्मशुद्ध! "हे म्हणजे गाईला दुध काढायला हरकत नाही, पण शेंगदाणा फोडायला पाप!"


धर्म जर विज्ञानापासून पळ काढेल तर तो अंधश्रद्धा होतो. भावना जर तर्काला चिरडून टाकतील, तर त्या समाजाला रोग देतात. आणि श्रद्धा जर सहअस्तित्व विसरली, तर ती फक्त पोकळ विधी उरते. म्हणून, दाणे टाका, पण ठराविक ठिकाणी व मर्यादित प्रमाणात. चिमण्या, स्थानिक पक्षी यांना परत येण्यासाठी कबुतरांचा अतिरेक रोखा. रुग्णालय, सार्वजनिक ठिकाणी कबुतरांसाठी अन्नबंदी करा.

हेच खरे धर्मकर्म – जिथे श्रद्धा, विज्ञान आणि पर्यावरण एकाच छत्राखाली येतात. बाकी... कबुतरांच्या प्रेमात वाहून गेलेल्यांनी पाण्याच्या ग्लासाकडे एकदा नीट बघावं – कदाचित तिथेच त्यांना अहिंसेचं खरे आरसे दिसतील!

***(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)***

# हत्ती वाचवा, पर्यावरण वाचवा!

**१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.**





या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे.

हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो.

हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमाणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अखयातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे. हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### जैनमुनींनी न्यायालयालाही जुमानलेले नाही

दादरचा कबुतरखाणा सुरूवात करण्यासाठी जैन मुनी सक्रिय झाले आहेत. प्रसंगी हाती शस्त्र घेऊ असे त्यांनी धमकावले आहे. मुंबई महानगरपालिकेंने छप्पर टाकले ते जैन व गुजराती समाजाने चाकु सुरीने कापून टाकले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मध्यस्थी करुन पर्यायी व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. जैन मुनी आता तर शस्त्र हाती घेऊन उर्मटपणे लढण्याची भाषा करीत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे कधीपासून सहन करू लागलेत ? न्यायालयाला जुमानत नाहीत व सत्ताधारी नांगी टाकुन आहेत. भाजपाची सत्ता मुंबई महानगर पालिकेत आली तर अरेरावीचा कळस गाठतील. तसेच हेच गुजराती मनमानी करायला बिलकुल धजावणार नाहीत. सत्ताधारी भाजपा अंतर्गत मिलीभगत असल्या शिवाय इतकी मजल मारली जाणार नाही. मतांचा जोगवा मागायचा असुन सत्ता हेच ध्येय गाठण्यासाठी मुख्यमंत्री नक्कीच शरणांगती घेत आहेत तर नाही? जो जैन समाज न्यायालयाला जुमानत नाही. याचा विचार आता मराठी माणसांनी विचार करणे गरजेचे आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर.अंधेरी.**

### अवयवदान सर्वश्रेष्ठ दान...

महाराष्ट्रात अवयवदानाच्या दिशेने सकारात्मक बदल होत असताना प्रत्यक्षात प्रत्यारोपणासाठी अवयवांची कमतरता गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे. राज्यात अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेतील रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी राज्यभरात अवयवदान पंधरवडा साजरा होत आहे. अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत दिवसेदिवस रुग्णांची वाढ होत आहे.त्यातुलनेत ब्रेन डेड पेशंट व अवयव दाते मिळत नाहीत. राज्यात अवयवदान प्रक्रियेचा गतिमान विस्तार व्हावा आणि अधिकाधिक रुग्णांना नवजीवन मिळावे. हजारो रुग्ण नवीन आयुष्य जगण्याच्या संधीच्या प्रतीक्षेत अवयवांअभावी मृत्युमुखी पडत आहेत.भारतातील अवयवदान दर प्रति दशलक्ष लोकसंख्येमागे एक टक्क्यापेक्षा कमी असल्याची स्थिती आहे. अवयवदान ही एक सामाजिक बांधिलकी आहे. समाजामध्ये या विषयाबाबत सकारात्मक मतपरिवर्तन घडवण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे.अवयवदान प्रक्रिया कमी वेळेत पूर्ण केली जावी.प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकाला अवयवदानाच्या कार्यपद्धतीची चांगली माहिती मिळाली तरच तो अवयवदान करु शकेल.अवयवदानासंदर्भातील जनजागृती वाढत असली तरी सामाजिक अंधश्रध्दा,माहितीचा अभाव,आणि अनेकदा अपघातात ब्रेन डेड झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचा नकार या सर्व कारणांमुळे अवयवदानाचा दर अद्यापही अपेक्षेप्रमाणे वाढलेला नाही.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### सरकारचे दुटप्पी धोरण?

कबुतरखाने बंद करण्याच्या न्यायालयाच्या निर्देशानंतरही दादर येथील बंदिस्त केलेली जागा उधळून लावणे, त्याच ठिकाणी गाड्यांच्या टपावर ट्रेमध्ये दाणे ठेवून कबुतरांना खाद्य पुरवणे, गिरगाव चौपाटीवर मोठ्या प्रमाणात धान्य घालणे आणि त्याची चित्रफीत बनवणे असे प्रकार शांततेचा पुरस्कार करणाऱ्या जैन समाजाकडून होत असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर सरकारकडून मात्र तुलनेने नरमाईची भूमिका घेतली जात असल्याचे जाणवते. याउलट, महिनाभरापूर्वी मराठी भाषिक जनतेने आंदोलन केल्यावर ते मोडून काढण्यासाठी सरकारने तात्काळ आणि कठोर कारवाई केली होती, तसेच कायदा व सुव्यवस्था पाळण्याचे आवाहनही करण्यात आले होते. परंतु, त्याच भूमिकेची कडक अंमलबजावणी इथे का दिसत नाही? कायद्याचे पालन सर्वांनीच करायचे असते. पण सरकारनेच अंमलबजावणीत निवडक कडकपणा आणि निवडक नरमाई दाखवायला सुरुवात केली, तर त्याला दुटप्पी भूमिका म्हणायची नाही तर काय? जैन समाजाबाबतची ही नरमाई केवळ एकगठ्ठा मते दूर जाऊ नयेत म्हणूनच आहे का, की यामागे आणखी काही कारणे दडली आहेत? हे स्पष्ट व्हायला हवे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### संरक्षण उत्पादनात विक्रमी वाढ

भारताचे संरक्षण उत्पादनात विक्रमी वाढ झाली असून ते दीड लाख कोटी रुपया पेक्षा जास्त झाले आहे गेल्या दशकात भारताची संरक्षण निर्यात जवळपास ३० पटीने वाढली आहे ही बातमी नुकतीच वाचनात आली जगात असलेली अशांतता अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांचे एकूणच लहरीपणाचे निर्णय या पार्श्वभूमीवर भारताने हे यश गाठले आहे २०१४-१५ हे उत्पादन ४६४२९ लाख कोटी रुपयांचे होते तर २४-२५ मध्ये ते १५०५९० लाख कोटी रुपयावरण गेले आहे या विक्रमी वाढीचे श्रेय संरक्षण उत्पादन विभाग , संरक्षण क्षेत्रातील उपक्रम इतर सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादक कंपन्या व खाजगी उधोगाच्या प्रयत्नांना दिले आहे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी नुकतीच हे बातमी दिली आहे . या क्षेत्रात भारताच्या दृष्टीने हे आवश्यकच होते

**- शांताराम वाघ पुणे**

## शीव-पनवेल महामार्गावरील बांधलेल्या भुयारी मार्गांचे तोडकाम सुरू

**पनवेल :** शीव पनवेल या ३० किलोमीटर अंतरावर पादचा-यांना सूरक्षित रस्ता ओलांडता यावा यासाठी १८ भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. मात्र अनेक वर्षांनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आली असून हे भुयारी मार्ग विनावापरात असल्याने त्याचे तोडकाम दोन दिवसांपासून सुरू करण्यात आले आहे. शीव पनवेल महामार्ग रुंदीकरण व कॉक्रीटीकरणासाठी नेमलेल्या सल्लागार समितीने चुकीचा सल्ला देऊन त्याची अंमलबजावणी करणा-या अभियंत्यांनी दुर्लक्ष केल्याने शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नूकसान झाल्याने हा खर्च सरकार कोणाकडून वसूल करणार असा प्रश्न सर्वसामान्य प्रवासी विचारत आहेत. शीव पनवेल महामार्गावरील प्रवास अवघ्या तीस मिनिटांत जलदगतीने करण्यासाठी आठ पदरी महामार्ग कॉंक्रीटचा बांधण्याचे नियोजन आखण्यात आले. नियोजनकर्त्यांनी रस्ता ओलांडण्यासाठी भुयारी मार्गाची आखणी केली. मुंबईचे चेंबूर येथील बीएआरसी ते कळंबोली सर्कल या पल्यापर्यंत १८ विविध भुयारी मार्ग बांधण्याचे काम पादचा-यांसाठी पूर्ण करण्यात आले.



**म ह त्त्वा चे**

### कल्याणमध्ये पादचारी वृद्धाला भुरळ घालून लुटले

**कल्याण :** कल्याण पश्चिमेत सिध्देश्वर आळी भागात शुक्रवारी दुपारी घरी पायी चाललेल्या एका वृध्दाला दोन इसमांनी भुरळ घालून, बोलण्यात गुंतवून लुटल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. काही अंतर पुढे निघून गेल्यानंतर वृध्दाला आपल्या बोटातील सोन्याची अंगठी गाहळ असल्याचे समजले. त्यानंतर त्यांना वाटेत भेटलेल्या दोन इसमांनी आपणास भुरळ घालून ती लुटून नेल्याचा संशय आला. त्यांनी या प्रकरणी बाजारपेठ पोलीस ठाण्यात दोन अनोळखी इसमांविरुध्द तक्रार केली आहे. मागील काही महिन्यांपासून रस्त्याने पायी जाणाऱ्या पादचारी ज्येष्ठ, वृध्द महिला, पुरूषांना लुटण्याचे प्रकार वाढले आहेत. बँकेतून बाहेर पडणारे, बाजारपेठेत खरेदी करणाऱ्या पादचारी वृध्द पुरूष, महिलेला यावेळी भुरट्यांकडून अधिक लक्ष्य केले जाते. कल्याण पश्चिमेत सुभाषनगर परिसरात राहणारे उदय नारायण जोशी (७३) शुक्रवारी दुपारी सव्वा वाजण्याच्या दरम्यान दूध डेअरीमधून दूध घेऊन पायी घरी चालले होते. बँक ऑफ महाराष्ट्र बँकेसमोरील रस्त्यावरून सिध्देश्वर आळीकडे जाणाऱ्या रस्त्याने पायी जात असताना तक्रारदार उदय जोशी यांना चाळीस वर्षाचे दोन इसम भेटले.

### पंडित दिनदयाळ चौक सात दिवस वाहतुकीसाठी बंद

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ पंडित दिनदयाळ रस्त्यावरील एव्हरेस्ट हाऊसमधील एक धोकादायक इमारत पुनर्बांधणीसाठी पोकलेनच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात येणार आहे. सोमवारपासून सुरू झालेले हे काम पुढील सोमवारपर्यंत सुरू राहणार आहे. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर हे काम होणार असल्याने वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी या तोडकामासाठी पंडित दिनदयाळ रस्त्यावरील दिनदयाळ चौक येथे (जुने द्वारका हॉटेल) येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कोपर पुलाजवळील हॉटेल रणजित येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे अशी अधिसूचना काढली आहे. सोमवारपासून हे काम सुरू झाले आहे. मंगळवार ते पुढील सोमवारपर्यंत हे काम तोडकाम सुरू राहणार असल्याने या कालावधीत पंडित दिनदयाळ चौक रस्त्याकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक कोपर पुलाजवळील हॉटेल रणजित येथे बंद करण्यात येणार आहे.

### तलावात बुडून 12 वर्षीय मुलाचा मृत्यू

**ठाणे :** घोडबंदर येथील कासारवडवली भागात पोहण्यासाठी गेलेल्या एका १२ वर्षीय मुलाचा तलावात बुडून मृत्यू झाला. पियुष सोनवणे(१२) असे मृत मुलाचे नाव असून तो इयत्ता पाचवी मध्ये शिकत होता. त्याच्या मृत्यूमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. वाघबीळ येथील झुम्मा नगर परिसरात पियुष सोनवणे राहत होता. सोमवारी दुपारी तो कासारवडवली येथील राम मंदिर तलावात पोहण्यासाठी गेला होता. परंतु त्याला पाण्याचा अंदाज येऊ शकला नाही. पाण्याचा अंदाज येऊ शकला नसल्याने तो बुडाला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कासारवडवली पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, ठाणे महानगरपालिकेचे डॉक्टर, अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.

## जितेंद्र आव्हाड केडीएमसी मुख्यालयात करणार मांसाहार

### 15 ऑगस्टला मांसविक्रीची दुकाने बंद ठेवण्याच्या आदेशाला विरोध

प्रतिनिधी
■ कल्याण



कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने येत्या 15 ऑगस्ट रोजी सर्व चिकन, मटण दुकाने, कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने पूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत. 14 ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ते 15 ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत कोणताही प्राणी कत्तल किंवा मांस विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 334, 336 आणि 374(अ) नुसार कारवाई होईल, असा इशारा पालिकेने दिला आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेने चिकन मटण विक्रीसाठी बंदी घातली आहे. पालिकेचा उद्देश स्वातंत्र्यदिन उत्साहात आणि पवित्र वातावरणात साजरा करण्याचा असल्याचे आदेशात नमूद केले आहे. याबाबतच्या नोटीसा महापालिका क्षेत्रातील चिकन व मटन विक्रेत्यांना देण्यात आल्या हेत. मात्र या निर्णयाविरोधात हिंदू खाटिक समाजाने आक्रमक पवित्र घेतला. आज महापालिका अधिकाऱ्यांची भेट घेत ही बंदी मागे घेण्याची मागणी केली.

कल्याण डोंबिवली शहरात रस्त्यांवरील खड्डे आहेत ,स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी आहे,पाणी समस्या आहे, अशी बरीच कामे कल्याण डोंबिवली महापालिकेला करण्यासारखे आहेत मात्र ती केली जात नाहीत 15 ऑगस्ट निमित्त चिकन व मटन विक्री बंद ठेवून ते आमच्या पोटावर पाय देतायत. त्यामुळे महापालिकेने हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा अन्यथा येत्या 15 ऑगस्टला महापालिका मुख्यालयाच्या गेटवरच मटन विक्री करण्यात येईल असा इशारा खाटीक समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

15 ऑगस्ट कल्याण डोंबिवलीतील चिकन मटण विक्री बंदीचा निर्णय मागे घेण्याची मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाने केली आहे. निर्णय मागे घ्या अन्यथा 15 ऑगस्ट रोजी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड केडीएमसी मुख्यालयात मांसाहार करणार असल्याचे शरद पवार गटाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे 15 ऑगस्ट रोजी केडीएमसीमध्ये मोठा राडा होण्याची शक्यता आहे. पालिकेच्या या आदेशानंतर कल्याणमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्यांमध्ये चांगलीच जुंपली आहे.

## वादात अडकलेले डुप्लीकेट मंत्री शिरसाट, कोकाटे, कदम यांची पथनाट्याद्वारे नक्कल

### ठाकरे शिवसेनेचे जनआक्रोश आंदोलन

प्रतिनिधी
■ ठाणे



शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सोमवारी ठाण्यात अनोखे आंदोलन केले. या आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ठाकरे गटाने आंदोलन करताना मंत्री संजय शिरसाट, माणिक कोकाटे, योगेश कदम आमदार संजय गायकवाड यांची नकल करणारे पथनाट्य सादर केले. यावेळी संजय शिरसाट यांची नकल करणाऱ्याने चक्क बॅग आणली होती. तर संजय गायकवाड यांची नकल करणारा बॉक्सिंग खेळत होता. माणिक कोकाटे यांना डिवचण्यासाठी पत्ते खेळले जात होते. त्यामुळे हे आंदोलन पाहण्यासाठी नागरिकांची देखील गर्दी उसळली होती.

ठाकरे गटाच्या वतीने ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाजवळ सोमवारी महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्त ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांनी केले. विशेष म्हणजे या आंदोलनात वादात अडकलेल्या मंत्री आणि आमदारांची पथनाट्याद्वारे नकल करण्यात आली. यावेळी संजय शिरसाट यांची नकल करणाऱ्याने बॅग आणली होती. तर संजय गायकवाड यांची नकल करणारे बॉक्सिंग खेळत होते. त्यांच्या एका हातात डाळीने भरलेली पिशवी तर दुसऱ्या हातात बॉक्सिंगसाठी लागणारे ग्लोज घातले होते.

## डोंबिवलीत गणपती मंदिरात अंगारकीनिमित्त विशेष नियोजन

■ डोंबिवली

डोंबिवली पूर्वेतील बापूसाहेब फडके रस्त्यावरील शतकोत्तर महोत्सव साजरा केलेल्या श्री गणेश मंदिरात अंगारकी चतुर्थी निमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. भाविकांची दर्शनासाठी वाढती गर्दी विचारात घेऊन मंदिरात प्रत्येक भाविकाला श्रध्देने दर्शन घेता यावे असे विशेष नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती येथील श्री गणेश मंदिर संस्थानच्या अध्यक्षा व प्रवचनकार अलका मुतालिक यांनी दिली.

श्री गणेश मंदिरात नियमित भाविकांची गर्दी असते. मंगळवारी या संख्येत वाढ असते. संकष्टी चुतर्थीच्या दिवशी मंदिरात गणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासून गर्दी असते. डोंबिवली शहर परिसरातील भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येतात. मंगळवारी (ता.१२) अंगारकी चतुर्थी आहे. वीस ते पंचविस हजाराहून अधिक नागरिक याठिकाणी दर्शनासाठी येण्याची शक्यता असल्याने मंदिराच्या मुख्य प्रवेशव्दारापासून दुतर्फा आणि गणपती मूर्तीसमोरील सभा मंडपात दर्शन रांगेचे नियोजन करण्यात आले आहे. मंदिरात पहाटे पाच वाजता काकड आरती झाल्यानंतर गणपतीवर अभिषेक आणि त्यानंतर यथासांग पूजा झाल्यानंतर भाविकांना मंदिरात दर्शनासाठी सोडण्यात येणार आहे.

## मुंबई-गोवा महामार्ग अगोदर सुरक्षित बनवा

### नंतरच पथकर वसुली करण्याची कोकणवासियांची मागणी

प्रतिनिधी
■ पनवेल



मुंबई गोवा महामार्गाचे काम १५ वर्षानंतरही अपूर्णच आहे. नुकतेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांनी पनवेल ते रत्नागिरी पाहणी दौरा केल्यानंतर या महामार्गाचे काम ९० ते ९५ टक्के काम पूर्ण झाले असून पुढील पाच महिन्यात उर्वरीत कामे पूर्ण होईल असा दावा मंत्र्यांनी केला आहे. मात्र कोकणाची विकासवाट ठरणा-या या महामार्गाला अजून पथदिवे नाहीत आणि पावसाळी पाणी जाण्यासाठी नाले बांधले नाहीत.

कॉंक्रीटच्या महामार्गाशेजारी वाहन उभे करण्यासाठी साईड पट्टीवर मातीचा भराव केल्यामुळे पावसाळ्यात वाहनांची चाके रुतून येथे अपघात होतात. पाच महिन्यात महामार्गाचे काम पूर्ण करुन पथकर वसुलीसाठी टोलधाडीच्या तयारीत असलेल्या सरकारी यंत्रणेने हा महामार्ग सुरक्षित करण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने प्रयत्न न केल्यास या महामार्गावरील प्रवास धोकादायक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महामार्ग प्राधिकरणाने यामधील काही ठिकाणी पावसाळी नाले व सेवा रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाची कामे करण्यासाठी दिडशे कोटी रुपयांची कामे प्रस्तावित केली आहेत. मात्र याबाबत अजूनही या प्रस्तावाला मंजूरी होऊन याची निविदा प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे अगोदर महामार्ग सूरक्षित बनवा नंतरच टोलधाडीची तयारी करा अशी मागणी कोकणवासियांकडून होत आहे.

## सुश्रुषा हॉस्पिटलला भीषण आग

### 21 रुग्णांना सुखरूप बाहेर काढले

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



नेरुळ सेक्टर-६ मधील सुश्रुषा रुग्णालयाच्या तळघरात सोमवारी सकाळी सुमारे ११ वाजता अचानक लागलेल्या आगीने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. तळघरातील एसी यंत्रणेतून ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

आग लागल्यानंतर रुग्णालयाच्या तळघरातून मोठ्या प्रमाणात धूर वरच्या मजल्यांवर पसरला. यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत सर्व २१ रुग्णांना शेजारील स्वामीनारायण मंदिरात सुरक्षित हलवले. त्यावेळी रुग्णालयात ४२ कर्मचारीही उपस्थित होते.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वाशी आणि नेरुळ अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. दलाने बचावकार्य राबवून आग आटोक्यात आणली. नंतर २१ पैकी २० रुग्णांना हॉस्पिटलच्या पनवेल शाखेत तर एका रुग्णाला वाशीतील फोर्टीस रुग्णालयात हलवण्यात आले. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती हॉस्पिटल प्रशासनाने दिली.

## नेरुळमध्ये मनसेची भव्य सराव दहीहंडी उत्सव संपन्न

### अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत शेकडो गोविंदा पथकांची सलामी

प्रतिनिधी
■ नवी मुंबई



महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नेरुळ-जुईनगर विभागातर्फे मनसे शहर सह सचिव अभिजीत देसाई व अनुष्का देसाई यांनी नेरुळ, सेक्टर-२ मध्ये भव्य सराव (चोर) दहीहंडी उत्सवा चे आयोजन केले होते. यामध्ये संपूर्ण मुंबई नवी मुंबईतून १०० गोविंदा पथकांनी हजेरी लावून सलामी दिली. मनसे नेते सन्मा. अमित साहेब ठाकरे यांच्या उपस्थितीने तरुणांमध्ये उत्साह संचारला होता.

नेरुळ प्रभाग क्र. ३१ मधील कार्यकर्त्यांनी सुंदर नियोजन केले होते. मनसे प्रवक्ते व शहर अध्यक्ष गजानन काळे यांची सुद्धा प्रमुख उपस्थिती होती. विभागातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सोसायटी पदाधिकारी, विविध महिला बचत गट यांचे पदाधिकारी यांनी दहीहंडी उत्सवाला उपस्थिती लावली. शेकडो गोविंदा पथक आणि सोबत मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती यामुळे परिसर तुडुंब भरला होता. "बोल बजरंग बली की जय", "ढाकू माक्कम' सारख्या गाण्यांनी संपूर्ण वातावरणात चैतन्य निर्माण झाले होते. अमित ठाकरे साहेब यांच्या उपस्थिती ने संपूर्ण नेरुळ आणि जुईनगर कर खूष होते. अमित ठाकरेंची एक छबी कॅमेऱ्यात टिपण्यासाठी नागरिक उत्सुक होते. सदर दही हंडी कार्यक्रमात अनेक मंडळानी सात थराची सलामी दिली. तर काही गोविंदा पथकांनी सहा व पाच थरांची सलामी दिली.

## कटुता जोपासल्या जाणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध केला पाहिजे - गणेश चिंचोले

■ डोंबिवली



समाज प्रबोधन करण्यासाठी कुणा समाज सुधारकाची वाट न पाहता ज्येष्ठ नागरिकांनीच थोडीफार कटूता घेत आपल्या सभोवताली जोपासल्या जाणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध केला पाहिजे, वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी आग्रह धरला पाहिजे, असे परखड विचार गणेश चिंचोले यांनी व्यक्त केले.

आयुष्याच्या या टप्प्यावर आपल्या अनुभवाच्या शिदोरीवर आपण हे सहज करू शकतो आणि येणाऱ्या नव्या पिढीला दिशा दाखवू शकतो अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. रविवारी १० ऑगस्ट रोजी डोंबिवली येथील आदर्श ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने ग्रेन मर्चंट असोसिएशनच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावरील कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

आपल्या पुढील पिढीचे भविष्य उज्वल करण्याकरिता वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याकरिता आग्रह धरणे, हे अनुभवी व ज्येष्ठ नागरिक म्हणून आपले कर्तव्य ठरते. अंधश्रद्धा निर्मूलन करणे म्हणजे कुणाही व्यक्तिविशेषाच्या विरोधात काम करणे असे नव्हे तर अनिष्ट रूढी प्रथा परंपरा यांच्या माध्यमातून होणाऱ्या शोषणाला विरोध करणे होय. असेही गणेश चिंचोले म्हणाले.

## मांस विक्री बंदीचा निर्णय मागे घ्यावा

### रिपब्लिकन पक्षाचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण डोंबिवली पालिकेने १५ ऑगस्ट, स्वातंत्र्यदिनी शहरातील लहान मोठ्या प्राण्यांचे कत्तलखाने बंद ठेवणे. तसेच या दिवशी शहरातील मटण, मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश काढले आहेत. याविषयावरून समाजाच्या अनेक घटक, राजकीय नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पालिकेने हा निर्णय मागे न घेतल्यास कल्याणमधील रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पालिका प्रशासनाला दिला आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाचे पदाधिकारी संजय जाधव यांनी यासंदर्भात एक निवेदन आयुक्तांना सोमवारी दिले. या पत्रात पालिकेने १५ ऑगस्ट रोजी शहरातील मटण, मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. या निर्णयाने मटण, मांस विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या एक दिवसाच्या कमाईवर प्रशासनाने गदा आणली आहे. पालिकेने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा. अन्यथा, रिपब्लिक पक्ष आठवले गट पालिका मुख्यालयासमोर मटण मांस विक्री करणारे विक्रेते, कत्तलखाने चालक यांच्यासह आंदोलन करील, असा इशारा रिपब्लिक आठवले गट पदाधिकारी संजय जाधव यांनी दिला आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

प्रतिनिधी
■ पनवेल

गोरगरिबांचे आधारवड, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शनिवार दिनांक २३ ऑगस्ट आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणारी हि स्पर्धा 'पुरुष खुला गट' आणि 'महिला खुला गट' अशा दोन गटात होणार असून प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## सात वर्षांच्या प्रलंबित मागण्यांसाठी जेएनपीए विद्यालयातील शिक्षकांचे बेमुदत उपोषण सुरू

प्रतिनिधी
■ उरण



जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विद्यालय (शेवा) मधील शिक्षक आणि शिक्षकेतर आशा १०३ कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी सोमवार पासून विद्यालयाच्या प्रवेशद्वारा समोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या कर्मचाऱ्यांचे गेल्या सात वर्षापासून संघर्ष सुरू आहे. रुस्तमजी केरावाला फाउंडेशन (आर के एफ) या संस्थेच्या कारभाराला आणि मानसिक छळाला कंटाळून अखेर ११ ऑगस्टपासून शाळेच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

यामध्ये सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि जुलै २०१९ पासूनचा महागाई भत्ता थकवला आहे. यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याला गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच संस्थेने अद्याप सातवा वेतन आयोगही लागू केलेला नसून वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलनकर्ते शिक्षक व कर्मचाऱ्यांनी केला आहे.

शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे, तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या कागदावरच राहिल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी विविध शासकीय कार्यालयांमध्ये अनेक पत्रव्यवहार केले. मात्र, त्यांच्या पत्रांची दखल घेतली नाही. यामुळे सहा वर्षांपासून त्यांचा पाठपुरावा व्यर्थ ठरला आहे.

कर्मचाऱ्यांची सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह त्यांच्या बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत हे उपोषण सुरूच राहणार आहे. अशी भूमिका आंदोलन कर्त्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतली आहे. उपोषणादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असे त्यांनी म्हटले आहे.

या आंदोलनाला जेएनपीएचे कामगार विश्वस्त रवींद्र पाटील, माजी कामगार विश्वस्त कॉ. भूषण पाटील,सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार,शिक्षक नेते नरसु पाटील,पालक संघटनेचे नेते आदींजनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. कर्मचाऱ्यांनी मागण्यांचे निवेदन येथील लोकप्रतिनिधी, समाजसेवक, जेएनपीटी प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही देण्यात आले आहेत.मागण्या मान्य होईपर्यंत हा लढा सुरूच राहील असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## एक महिन्यात समस्या सोडवा, अन्यथा पालिकेला टाळं ठोकू

### पालिकेवर धडक देत भाजपचा इशारा

■ अंबरनाथ

अंबरनाथमध्ये भाजपकडून आज पालिकेवर विशाल मोर्चा काढण्यात आला. अंबरनाथमधील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्या एक महिन्यात सोडवा, अन्यथा पालिकेला टाळं ठोकू; असा इशारा यावेळी भाजपाचे प्रदेश सचिव गुलाबराव करंजुले यांनी दिला आहे. भाजपच्या या मोर्चामुळे पालिका परिसर दणाणून गेला होता. अंबरनाथच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून अंबरनाथ पालिकेवर हा मोर्चा काढण्यात आला. पालिकेच्या आवारात मोर्चा येताच मुख्याधिकाऱ्यांचा प्रतिकात्मक पुतळा आणत त्याला जोडे मारण्यात आले. यानंतर पालिकेच्या आत येऊन मुख्याधिकारी उपस्थित नसल्याने भाजप पदाधिकाऱ्यांनी पॅसेजमध्येच ठिय्या आंदोलन केलं. यावेळी चर्चा करण्यासाठी आलेल्या उपमुख्याधिकाऱ्यांवर भाजपा कार्यकर्त्यांनी खोट्या नोटा फेकत निषेध केला.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

अग्निशमन विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील रेडीओ ट्रंकींग सिस्टीमची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे कामांकरीता निविदा ई टेंडरींग पध्दतीने मागविण्यांत येत आहेत. निविदा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१२/०८/ २०२५ ते दि.०२/ ०९/ २०२५ या कालावधीत उपलब्ध असतील. सदरच्या निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि.०२/०९/ २०२५ रोजी १६.०० वाजे पर्यत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि .०८/०९/२०२५ रोजी १६.३० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यांत येईल. निविदा सुचना आणि निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेची अधिकत संकेतस्थळ https:// www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. ई टेंडरिंगबाबत अधिक माहितीसाठी अग्निशमन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/अग्निशमन/५११/२०२५-२६
दि:११.०८.२०२५
Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

सही/-
मुख्य अग्निशमन अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

## पारनेर दूध संघ पुन्हा विखे समर्थकांच्या ताब्यात

**अहिल्यानगर :** पारनेर तालुका सहकारी दूध संघाच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत भाजपचे माजी खासदार सुजय विखे पाटील व शिवसेना (शिंदे गट) आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळाने १५ पैकी १२ जागांवर विजय मिळवत वर्चस्व निर्माण केले तर खासदार नीलेश लंके समर्थक सहकार विकास पॅनलला केवळ ३ जागा मिळवता आल्या. जनसेवा मंडळाचे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे- सर्वसाधारण मतदार संघ: दादाभाऊ वारे, किसन गवळी, दत्तात्रय पवार, संदीप ठुबे, कल्याण काळे, सविता औटी, उत्तम भालेकर, निर्मला भालेकर. इतर मागास प्रवर्गमधून युवराज पठारे, अनुसूचित जातीमधून भीमराव शिंदे व विमुक्त जाती मतदारसंघात राजेंद्र पचारणे विजयी झाले. तर खासदार लंके समर्थक सहकार विकास मंडळाचे सर्वसाधारण मतदार संघातून अनिकेत पठारे, संतोष गांगड व महिला मतदार संघातून पूनम मुंगसे असे ३ उमेदवार विजयी झाले.



**महत्त्वाचे**

### जळगावातील सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला वीरमरण

**जळगाव :** जिल्ह्यातील गुढे (ता. भडगाव) येथील मूळ रहिवाशी असलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला कर्तव्यावर असताना पश्चिम बंगालमध्ये शनिवारी वीरमरण प्राप्त झाले. स्वप्नील सुभाष सोनवणे (३९) असे त्यांचे नाव आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता त्यांच्या पार्थिवावर जन्मगावी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. जवान सोनवणे हे सीमा सुरक्षा दलात पश्चिम बंगालमध्ये जी.डी. कॉन्स्टेबल पदावर कार्यरत होते. बांगलादेशच्या सीमेवरील फ्लड लाईट खांब क्रमांक १७ दुरुस्तीचे काम शनिवारी करत असताना त्यांना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. आणि ते सरळ खाली सिमेंट काँक्रिटच्या तळावर जाऊन पडले. त्यांना तत्काळ सीमा सुरक्षा दलाच्या रुग्णवाहिकेतून सहकाऱ्यांसह बाळुरघाट जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, रात्री साडेआठ वाजता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तिथे मृत घोषित केले.

### बांधकाम व्यावसायिकाकडून आर्थिक फसवणूक

**पुणे** : पुणे शहरातील कात्रज घाटात रंगकाम करणाऱ्या कंत्राटदाराने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. चंदर पिराजी मोहिते (वय 56) या कंत्राटदाराने मध्यरात्री कात्रज घाटातील अन्विषा लॉजमागील झाडाला गळफास घेऊन जीव दिला. मोहिते यांच्या पत्नी शकुंतला यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बांधकाम व्यावसायिक संतोष चोरगे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. चंदर मोहिते हे गृहप्रकल्पातील रंगकामाचे कंत्राट घेत असत. चोरगे यांनी त्यांना तीन गृहप्रकल्पात रंगकाम करण्याचे काम दिले होते. या कामाच्या बदल्यात चोरगे यांनी मोहिते यांना एक सदनिका आणि साडेदहा लाख रुपये देण्याचे मान्य केले होते. मोहिते यांनी परिचितांकडून हातउसने पैसे घेऊन तीनही गृहप्रकल्पांचे रंगकाम पूर्ण केले. मात्र, व्यवहारात ठरल्यानुसार चोरगे यांनी मोहिते यांना पैसे आणि सदनिका दिली नाही. मोहिते यांनी रंगकामाचे पैसे मागितले असता चोरगे यांनी त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अंगणातून चंदनाचे झाड पळवले

**हिंगोली** : हिंगोली शहरात जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानच्या अंगणातील चंदनाचे झाड चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोमवारी ता. ११ हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांनी ओळख पटविण्याचे प्रयत्न चालविले असून या घटनेमुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. हिंगोली शहरात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे निवासस्थान आहे. या ठिकाणी त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला असून दर आठ तासांना दोन कर्मचारी कर्तव्यावर येतात. या शिवाय अंगणातील झाडांची देखभाल करण्यासाठी एक माळीकाम करणाऱ्या कर्मचाऱ्याचीही नियुक्ती आहे. दरम्यान, रविवारी ता. १० रात्री नेहमी प्रमाणे पोलिस कर्मचारी कर्तव्यावर होते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश करून त्या ठिकाणी असलेले चंदनाचे झाड तोडून नेले.

# भाजपकडे कार्यकर्त्यांचा अभाव - सपकाळ

## महायुतीचे लुटेरे सरकार; 40 टक्क्यांने वसुली सुरु - वडेट्टीवार

प्रतिनिधी
■ खडकवास

काँग्रेस पक्ष हा देशातील सर्वात जुना व अनुभवी पक्ष असून काँग्रेस विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. काँग्रेसकडे सक्षम व समर्थ नेतृत्व व कार्यकर्ते आहेत. तर भाजपा दुसऱ्या पक्षातील कार्यकर्ते खाणारी चेटकीण आहे. मुख्यमंत्र्याच्या आजूबाजूला व मंत्रीमंडळाकडे पाहिले तर काँग्रेसचेच लोक दिसतात. एक कोटी सदस्य व मोदींसारखे नेतृत्व आहे म्हणतात पण ते नेतृत्व सक्षम नसून पोकळ आहे म्हणूनच त्यांना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना घ्यावे लागत असून ही शोकांतिका आहे. काँग्रेसमुक्त भारत करण्याच्या नादात भाजपाच काँग्रेसयुक्त झाला, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.



काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे खडकवासला येथे उद्घाटन झाले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार,विधान परिषदेतील गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, यू बी. व्यंकटेश, उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेबद्दल प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली असून प्रत्येक कार्यकर्ता प्रशिक्षित असावा हा त्यामागचा उद्देश आहे. यात orientation, introduction, आणि interaction ही त्रिसुत्री असणार आहे. दोन दिवस वरिष्ठ नेते व विविध विषयातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत आगामी काळातील कार्यक्रमांची रुपरेषा ठरवली जाईल व कृती कार्यक्रम आखण्यात येणार आहे. निवडणुकीपुरते जागे व्हायचे आणि निवडणुकीनंतर सर्व संपले असा काँग्रेसचा विचार नसून काँग्रेस हा निरंतर चालणारा व स्वराज्याच्या दिशेने कुच करणार पक्ष आहे. काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यावेळी म्हणाले की, आपल्या समोर आव्हाने खूप आहेत, काँग्रेसने सत्ता सर्वोच्च कधीच मानली नाही, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समाज घटकांना नजरेसमोर ठेवून काम केले पण भाजपा मात्र फक्त दोन उद्योगपतींसाठी सरकार चालवत आहे. सत्ता ही सामान्य माणसांसाठी असली पाहिजे. लोकांना जोडण्याचे काम करा, तुमची ओळख कामाने, कर्तृत्वाने निर्माण करा.

# अनियंत्रित कार कावड यात्रेत घुसली, दोन जणांचा मृत्यू, चारजण गंभीर जखमी

प्रतिनिधी
■ परभणी

श्रावणी सोमवार असल्याने भाविक दर्शनासाठी जात आहेत. त्यानुसार दर्शनासाठी कावड यात्रा घेऊन जात असलेल्या भाविकांमध्ये कावड यात्रेसोबत असलेली कार अनियंत्रित होऊन घुसली. यामध्ये भाविक चिरडले गेले असून दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर चार भाविक जखमी झाले असून जखमींना लागलीच उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

परभणीच्या पाथरी तालुक्यातील खेडुळा पाटी येथे पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला आहे. या अपघातात ऋषिकेश सुरेशराव शिंदे (वय १६) व एकनाथ गंगाधरराव गजमल (वय ५०) असे अपघातात मयत झालेल्या व्यक्तींची नावे आहेत.



दरम्यान श्रावण महिना असल्याने भाविक कावड यात्रा काढत जवळच्या महादेवाच्या मंदिरावर दर्शनासाठी जात आहेत. त्यानुसार पाथरी येथून काही भाविकांची कावड यात्रा सेलूच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. वाटेतच भाविकांवर काळाने झडप घातली.

परभणीच्या सेलू तालुक्यातील भाविकांची कावड रविवार (१० ऑगस्ट) पाथरी तालुक्यातील रत्नेश्वर रामपुरी येथे पोहोचली होती. आज ११ ऑगष्ट रोजी गोदावरी नदीचे पवित्र पाणी घेऊन पहाटे भाविक भक्तिगीतांच्या तालावर व जल्लोषात पायी सेलूकडे परत निघाले होते. मात्र पहाटे साडेपाचच्या सुमारास पाथरी शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर खेडुळा पाटीजवळ कावड सोबत असलेली कार अज्ञात वाहनाला धडकली. यानंतर नियंत्रण सुटून थेट भाविकांवर आदळली. तीन ते चार भाविक जखमी झाले असून त्यांना तातडीने सेलू येथे उपचारासाठी हलविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

# रत्नागिरीत शिवसेना ठाकरे पक्षाचे राज्य सरकार विरोधात तीव्र आंदोलन

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

राज्य सरकार व भ्रष्ट मंत्र्यांविरोधात सोमवारी सकाळी शिवसेना ठाकरे पक्षाकडून रत्नागिरीत तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील शिवसैनिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र येत जोरदार घोषणाबाजी करत राज्य सरकारचा निषेध व्यक्त केला.

यावेळी आंदोलनात सत्ताधारी नेत्यांच्या अनेक वादग्रस्त विधानांवर आणि कथित घोटाळ्यांवर टीका करण्यात आली. “सरकारचा पैसा आहे, आपल्या बापाचे काय जाते?” असे वादग्रस्त विधान करणाऱ्या समाजकल्याण मंत्र्यांवर कारवाई न झाल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त



करण्यात आला. याबरोबर हे सरकार भिकारी आहे, असे म्हणणाऱ्या मंत्र्यांनाही मंत्रिमंडळात कायम ठेवल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी सेनेच्या आंदोलकांनी सत्ताधारी मंत्र्यांच्या अनेक कथित गैरव्यवहारांची यादीच मांडली. यामध्ये समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्यावर ६० कोटींचा घोटाळा आणि १५०० कोटींच्या गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले.

त्याचप्रमाणे, कृषीमंत्री असताना रमी खेळणारे माणिकराव कोकाटे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांबद्दल बोलताना “ढेकळांचे पंचनामे करायचे का?” असे असंवेदनशील विधान करणाऱ्या मंत्र्यांचाही निषेध करण्यात आला.

# ‘संजय नोटावाले, रमीराव ढेकळे अशी तिरकस नावे देत शिवसेनेचे आंदोलन

प्रतिनिधी
■ संभाजीनगर

‘संजय नोटावाले’, ‘रम्मीराव ढेकळे’, ‘योगेश डान्सबारवाले’ , ‘ गुलाबी महाजन’, ‘ अघोरी जादूवाले’ असे ‘ बनावनवी ’ चित्रपटातील कलाकार असून संवाद म्हणून ‘ कारवाई करू,’, ‘ हे सहन केले जाणार नाही’, हे या चित्रपटाचे संवाद आहेत , अशी तिरकस टीका करत शिवसेना (उद्धव ठाकरे ) पक्षाच्या वतीने शहरातील क्रांती चौक परिसरात राज्य सरकारच्या कलंकित मंत्र्यांच्या विरोधात सोमवारी आंदोलन करण्यात आले.

‘मला लाज वाटते ’ अशी घोषणा देत शिवसैनिकांनी सरकारला खिजवणाऱ्या घोषणा दिल्या. विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात शिवसैनिक सहभागी झाले.

कलंकित आणि भ्रष्टाचारी मंत्री



राज्याच्या मंत्रीमंडळात आहेत. त्यांना तातडीने काढून टाकायला हवे अशी शिवसेनेची मागणी आहे. विधानसभेत मंत्री रम्मी खेळतात, एका मंत्र्याचा डान्सबारच आहे, एक मंत्री पैशासह सिगरेट ओढत बसतो, एक जण अघोरी जादूटोणा करत असल्याचे दिसते. हे सारे महाराष्ट्राला लाजणारे आहे. या मंत्र्यांची लाज आता वाटते आहे. प्रश्न विचारले किंवा अधिकची माहिती विचारली की, कारवाई केली जाईल. हे सहन केले जाणार नाही, असे संवाद ऐकू येतात. या सर्वास महाराष्ट्रातील जनता वैतागलेली असल्याने हे आंदोलन केले असल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले.

क्रांती चौकात एका व्यासपीठावर बसून शिवसैनिक आणि अंबादास दानवे तसेच चंद्रकांत खैरे यांनी ‘ आम्हाला या मंत्र्यांची लाज वाटते, ’ अशा आशयाच्या घोषणा दिल्या. या वेळी ‘ मला लाज वाटते ’ असे पथनाट्यही सादर करण्यात आले. शहरातील पाणी पुरवठ्याच्या विलंबावरुन ‘ लबाडानो पाणी द्या’ असे आंदोलन केल्यानंतर राज्यभर कलंकित मंत्र्याच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

# 22 महापालिकेतील कामगारांच्या विविध मागण्या मिळवून घेण्यासाठी पुणे येथे मेळावा

प्रतिनिधी
■ पुणे

महाराष्ट्र राज्य महानगरपालिका-नगरपालिका, कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक काल "पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवक सहकारी पतसंस्था कार्यालय, शुभम गॅलरीया, पिंपरी, पुणे" येथे झाली. या बैठकीत विविध महापालिकेतील कामगार, कर्मचाऱ्यांच्या मागण्या मिळवून घेण्यासाठी,रविवार २४,ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका कामगार, कर्मचारी,अधिकाऱ्यांचा मेळावा, पिंपरी चिंचवड येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला सदर मेळाव्यामध्ये हे प्रश्न सोडवून घेण्याच्या अनुषंगाने आंदोलनाची



दिशा निश्चित केली जाईल.असे ठरविण्यात आल्याचे दि म्युनिसिपल युनियनचे सरचिटणीस.रमाकांत बने यांनी सांगितले.

सदर बैठकीसाठी महाराष्ट्रातल्या २२ महानगरपालिकेतील पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये विविध महानगरपालिकेतील कामगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.प्रामुख्याने तीन ते चार महिन्यांचे पगार न मिळणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे. वाढते कंत्राटीकरण, रुग्णालयांमध्ये नर्सिंग कौन्सिल आणि सलीम मर्चंट अवॉर्ड प्रमाणे रुग्ण आणि कर्मचाऱ्यांचे प्रमाण निश्चित करणे. सर्व कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना लागू असलेली २० लाख व अधिक रुपयाची वैद्यकीय सहाय्याची योजना लागू करणे इतर मागण्यांवर चर्चा करण्यात आली

या सभेस मुंबईतील दि म्युनिसिपल युनियनचे अध्यक्ष शशांक राव, उपाध्यक्ष रंगनाथ सातवसे, सरचिटणीस रमाकांत बने आणि खजिनदार प्रकाश गोळे उपस्थित होते.

# तिसरीत शिकणाऱ्या मुलीवर तिच्याच वर्गमित्राकडून अत्याचार

प्रतिनिधी
■ यवतमाळ

यवतमाळमध्ये अंगावर शहारा आणणारी घटना उघडकीस आली आहे. तिसरीत शिकणाऱ्या 8 वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच वर्गातील मुलाने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेने शाळा प्रशासनही हादरले असून मुलीच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

यवतमाळच्या जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या मुलीवर तिच्याच वर्गातील मुलाने अत्याचार केला. मिळालेल्या माहितीनुसार, मुलाने बाथरुममध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसंच, हे कृत्य करण्यासाठी एका मुलीनेही त्याला मदत केल्याचे समोर



आले आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांत अल्पवयीन मुलगा आणि मुलीविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीला गुप्तांगाजवळ जखमा झाल्या होत्या. याचाच त्रास होत असल्याने तिने त्याच्या आईला हा प्रकार सांगितला. त्यानंतर आईने लगेचच पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून बाभुळगाव पोलिसांनी अल्पवयीन मुलगा आणि मुली विरुद्ध पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही अल्पवयीन बालकांना बाल निरीक्षणगृहात ठेवण्यात आले आहे,

यवतमाळच्या दारव्हा येथे महिलेवर सामूहिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. या ३४ वर्षीय महिलेला दारव्हा-बागवाडी मार्गावरील एका ले-आउटमध्ये नेऊन पाच जणांनी

# 'दामदुप्पट'च्या आमिषाने फसवणूक

## ‘मातृभूमी ग्रुप’चा संचालक चिपळूण पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी
■ चिपळूण

चिपळूण येथील नागरिकांची रक्कम दामदुप्पट करून देण्याचे प्रलोभन दाखवून त्यांची फसवणूक करणाऱ्या मातृभूमी ग्रुप ऑफ कंपनीच्या संशयित संचालकाला मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने उत्तर प्रदेशातून अटक केली आहे. प्रदीप रवींद्र गर्ग असे त्याचे नाव असून, तो मूळचा मीरारोड येथील राहणारा आहे. त्याला रविवारी चिपळूण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्याला न्यायालयासमोर



हजर केल्यानंतर बारा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

त्याने धाराशिव, रत्नागिरी, सोलापूर, हिंगोली, लातूर आणि सातारा या सहा जिल्ह्यांतील हजारो नागरिकांना गुंतवणुकीचे प्रलोभन दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केली. यासंदर्भात प्रत्येक जिल्ह्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिपळूण येथे २०१९ मध्ये त्याने मातृभूमी ग्रुप ऑफ कंपनीच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक केली होती.

# रत्नागिरी शहर खड्ड्यांनी भरले ; अनेक ठीकाणी रस्त्यांची दुर्दशा

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील खड्डयांनी सर्वांना बेजार करुन सोडले असताना याबरोबर रत्नागिरी शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्वच्छ आणि सुंदरतेचा ढोल पिटणारी रत्नागिरी नगर पालिकेने याकडे डोळेझाक केल्याने वाहन चालक व नागरिकांच्या जीवावर बेतले आहे.



शहरातील रस्त्यांची झालेली दुर्दशा कधी सुधारणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

रत्नागिरी शहरातील रस्ते म्हणजे रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्ते अशी स्थिती पहावयास मिळत आहे. गेली अनेक वर्षे शहरातील रस्त्यांची ही दयनीय स्थिती कधी सुधारणार? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. आता श्रावणातील विविध सण साजरे केले जाणार आहेत तसेच कोकणचा गणेशोत्सवही काही दिवसांवर येवून ठेपला आहे. या पार्श्वभूमीवर खड्डे बुजवून येणा-या गणेशाची स्वारी निर्विघ्नपणे घरी आली पाहिजे, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. स्मार्टसिटी म्हणून निवड झालेल्या रत्नागिरी शहरातील रस्ते सुधारले नाहीत तर पर्यटन व्यवसायालाही फटका बसण्याची शक्यता आहे.

# सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी महायुती कटिबद्ध - चव्हाण

## कोकणच्या अर्थव्यवस्थेलाही पश्चिम महाराष्ट्रसारख्या सहकारी तत्वाच्या माध्यमातून बळकटी द्यावी - दरेकर

प्रतिनिधी
■ सांगली

शेतकरी उन्नती, दुग्ध व्यवसायाला चालना आणि सहकार चळवळीचे बळकटीकरणासाठी भाजपा-महायुती सरकार सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज इंदिरा पॅलेस सभागृहात पार पडलेल्या वाळवा शिराळा को. ऑप. डेअरी लि. रेठेधरण ता. वाळवा नूतन संचालक निवड व दूध उत्पादक शेतकरी मेळाव्यात दिली. तर भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी कोकणच्या अर्थव्यवस्थेलाही पश्चिम महाराष्ट्रसारख्या सहकारी तत्वाच्या माध्यमातून कशी बळकटी देता येईल याचा विचार करावा, अशी




विनंती प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याकडे केली.

सदर कार्यक्रमाला भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे, आ. सदाभाऊ खोत, आ. सुरेश खाडे, आ. सत्यजित देशमुख, सांगली जिल्हा सहकारी बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील, भाजपा पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, माजी आ. भगवानराव साळुंखे, जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम, निमंत्रक भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, सांगली बँकेचे संचालक राहुल महाडिक यांसह मोठ्या संख्येने सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले कि, या भागात २०२१ मध्ये सुरु झालेला हा प्रवाह आणि या प्रवाहाला एक अत्यंत चांगल्या पद्धतीने या भागातील, तीन तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी त्यांचा पूरक व्यवसाय म्हणून उचलून धरले. जवळजवळ तिन्ही तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी असणारी १२०-१३० दूध संकलन केंद्रातून ४० हजारपेक्षा जास्त लिटर संकलन होतेय. खऱ्या अर्थाने या भागाला वेगळ्या पद्धतीचा आयाम देण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून सम्राट महाडिक आणि त्यांचे सहकारी करत आहेत. प्रत्येक क्षेत्र येणाऱ्या काळात महाराष्ट्राला एक ट्रिलीयन अर्थव्यवस्थेकडे घेऊन जाणार आहे. त्यात सर्वात मोठी भूमिका शेतकरी बांधवांची असणार आहे.

आमदार प्रविण दरेकर म्हणाले कि, महाडिक युवा, आक्रमक नेते आहेत. श्रद्धा-सबुरीचे फळ काय असते त्याचे उत्तम उदाहरण सम्राट महाडिक आहेत. पश्चिम महाराष्ट्राचा विकास मोठ्या प्रमाणावर सहकाराच्या माध्यमातून झाला. परंतु दुर्दैवाने येथे सहकार क्षेत्राचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. कधीकाळी सहकारी तत्वावर साखर कारखाने होते. परंतु ते कारखाने खासगी झाले आहेत. अनेक सहकारी संस्थांचे खासगीकरण झालेय. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सहकार क्षेत्राची वाईट अवस्था झालीय. दूध उत्पादक संघ असो किंवा सहकारी संस्था त्या चालवणे जिकरीचे झाले असल्याचेही दरेकर म्हणाले. तसेच दरेकर पुढे म्हणाले कि, नुकतीच राज्य सहकारी संघाची निवडणूक झाली. त्या निवडणुकीत ताकदीने उतरलो व २१ पैकी २० जागा आपल्या सहकारी पॅनेलच्या निवडून आणल्या. त्यातील १३ संचालक भाजपचे आहेत. येणाऱ्या काळात नव्या पिढीला शिक्षण, प्रशिक्षण देण्याची भूमिका राज्य सहकारी संघाच्या माध्यमातून निभावायची आहे.

तसेच आ. दरेकर यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याकडे विनंती करताना म्हटले कि, कोकणात हळदीचा प्रयोग झाला. हळदीचे उत्पादन सिंधूदुर्ग जिल्ह्यात सुरु झालेय. कोकणचा प्रदेशही अशा प्रकारच्या दूध डेअरी, फलोत्पादनवर प्रक्रिया करणारे कारखाने काढून कोकणच्या अर्थव्यवस्थेलाही पश्चिम महाराष्ट्रसारख्या सहकारी तत्वाच्या माध्यमातून बळकटी कशी देता येईल याचा विचार करावा.

**जाहीर सूचना**

जाहीर सूचना माझे अशिल श्री. जिगर कांतीलाल उपाध्याय यांच्या वतीने देण्यात आली आहे, जे फ्लॅट एफ / २२४, दुसरा मजला, सुकंचन को-ऑप. हाऊ. सोसा. लि., तुळींज, टांकी रोड, नालासोपारा (पूर्व), जि. पालघर-४०१२०९ चे त्यांचे पिता दिवंगत कांतीलाल भगवानजी उपाध्याय यांच्या समवेत संयुक्त मालक आहेत, मोजमापाचा ४१.८२ चौ.मी. (बिल्ट-अप एरिआ), असलेला सव्हे नं. ६६, हिस्सा नं. १, भाग प्रमाणपत्र क्र. १, ५ भाग धारण केलेले विभिन्न क्र. २९६ ते ३००, माझ्या अशिलाचे पिता १९/०४/२०२३ रोजी नालासोपारा (पूर्व), जि. पालघर-४०१२०९ येथे त्यांच्या मागे त्यांची पत्नी श्रीमती चंद्रीका कांतीलाल उपाध्याय, एक कन्या कुमारी हेतल कांतीलाल उपाध्याय (श्रीमती हेतल दिलीप ओझा) आणि एक सुपुत्र श्री. जिगर कांतीलाल उपाध्याय यांना मागे सोडून निधन पावले, त्यांना वगळता अन्य कोणीही दिवंगताचे कायदेशीर वारसदार नाहीत आणि श्रीमती चंद्रीका कांतीलाल उपाध्याय, कुमारी हेतल कांतीलाल उपाध्याय (श्रीमती हेतल दिलीप ओझा) यांनी श्री. जिगर कांतीलाल उपाध्याय यांच्या नावे नोंदणीकृत हक्क सोड प्रमाणपत्राद्वारा त्यांचे भाग सोपविले आहेत आणि आता माझे अशिल मालक म्हणून वर नमूद केलेल्या रूमचा वापर, कब्जा केलेला आहे आणि माझे अशिल वर नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांच्या गहाणवटीच्या अनुसार संबंधित फायनान्स कंपनीकडून गृहकर्जाचा लाभ घेतला आहे. जर कोणताही दिवंगताचा कायदेशीर वारसदार किंवा कोणत्याही व्यक्तीचा वर नमूद केलेल्या गृहकर्ज प्रक्रियेबाबत कोणत्याही आक्षेप असल्यास, तर सदर आक्षेपाची जाहीर सूचनेच्या प्रसिद्धीच्या ७ दिवसांच्या आत अरुण कुमार जैन, ॲडव्होकेट, पत्ता - शॉप नं. १, मिठबाव वाडी, आउडसाईड विरार पूर्व पार्किंग जवळ, एसबीआय बँक गार्डनसमोर, विरार (पू), जि. पालघर-४०१ ३०५ यांच्याकडे दाखल करावा.

**दिनांक : १२/०८/२०२५**

**स्वाक्षरी/-
अरुण कुमार जैन,
वकील, उच्च न्यायालय**

**मुंबई :** कुर्ला विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे आमदार मंगेश कुडाळकर यांच्या माध्यमातून नारळी पौर्णिमा सणानिमित्त विभागीय कार्यालयाच्या प्रांगणात नारळ फोडी हा पारंपरिक आणि आनंददायी खेळ उत्साहात खेळण्यात आला. या सांस्कृतिक उपक्रमात आमदार मंगेश कुडाळकर यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ह्या उत्सवात परंपरा आणि एकात्मतेचा संदेश देणारा हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.





# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक लोकसभेत मंजूर

## स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी क्रीडा सुधारणा - क्रीडामंत्री

**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

सोमवारी, लोकसभेने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणि राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक सुधारणा विधेयक, २०२५ मंजूर केले. क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी स्वातंत्र्यानंतर भारतीय खेळांमध्ये ही सर्वात मोठी सुधारणा असल्याचे म्हटले. दरम्यान, बिहारमध्ये मतदार यादी पुनरावृत्ती (SIR प्रक्रिया) आणि कथित मतदान फसवणुकीविरुद्ध विरोधकांनी निषेध सुरूच ठेवला.



राष्ट्रीय क्रीडा विधेयक आणण्याची प्रक्रिया १९७५ मध्ये सुरू झाली. परंतु प्रत्येक वेळी राजकीय कारणांमुळे हे विधेयक संसदेत कधीच पोहोचू शकले नाही.

विधेयक मंजूर करताना मनसुख मांडवीय म्हणाले, स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी क्रीडा सुधारणा आहे. हे विधेयक क्रीडा संघटनांमध्ये जबाबदारी, न्याय आणि चांगले प्रशासन सुनिश्चित करेल." त्यांनी असेही म्हटले की हे विधेयक भारताच्या क्रीडा व्यवस्थेसाठी खूप महत्वाचे आहे, परंतु विरोधी पक्ष त्यात सामील झाले नाहीत हे दुर्दैवी आहे.

सकाळी झालेल्या गोंधळामुळे सभागृह तहकूब करण्यात आले, परंतु दुपारी २ वाजता सभागृह पुन्हा सुरू झाले, तेव्हा दोन्ही विधेयके मंजूर करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे कूच करत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आल्याने बहुतेक विरोधी नेते त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हते. चर्चेदरम्यान, काही विरोधी खासदारांनीही विधेयकाला पाठिंबा दिला, परंतु नंतर विरोधी पक्ष परतले आणि घोषणाबाजी सुरू केली. गोंधळादरम्यान, विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

हे विधेयक २३ जुलै रोजी सादर करण्यात आले. क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी २३ जुलै रोजी लोकसभेत राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक, २०२५ सादर केले. या विधेयकात क्रीडा विकासासाठी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन संस्था, राष्ट्रीय क्रीडा मंडळ, राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेल आणि राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण तयार करण्याची तरतूद आहे. हे विधेयक जीपीसीकडे पाठवण्याची मागणीही संसदेत करण्यात आली आहे.

१९७५ मध्ये सुरुवात झाली राष्ट्रीय क्रीडा विधेयक आणण्याची कल्पना १९७५ मध्ये सुरू झाली. परंतु राजकीय कारणांमुळे ते कधीच संसदेत पोहोचू शकले नाही. २०११ मध्ये राष्ट्रीय क्रीडा संहिता बनवण्यात आली, जी नंतर विधेयकात रूपांतरित करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु ती देखील अडकली. आता, २०३६ च्या ऑलिंपिकसाठी बोली लावण्याच्या तयारीचा एक भाग म्हणून, क्रीडा व्यवस्थापनात पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यवस्था आणण्यासाठी ते आणण्यात आले आहे.

### राष्ट्रीय क्रीडा विधेयकाचा उद्देश...

राष्ट्रीय डोपिंग विरोधी विधेयक काय आहे? राष्ट्रीय डोपिंग विरोधी (सुधारणा) विधेयक, २०२५ हा भारतातील डोपिंग विरोधी प्रणाली आंतरराष्ट्रीय मानकांनुसार बनवण्यासाठी आणण्यात आलेला कायदा आहे. त्याचा मुख्य उद्देश भारताची राष्ट्रीय डोपिंग विरोधी संस्था (NADA) पूर्णपणे स्वतंत्रपणे काम करेल आणि त्यावर सरकारचा थेट हस्तक्षेप होणार नाही याची खात्री करणे आहे.

### बीसीसीआयला आरटीआय लागू होणार नाही

बीसीसीआय अजूनही माहिती अधिकाराच्या कक्षेत येणार नाही. क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकात सुधारणा केली आहे. त्यानुसार, आता फक्त त्या क्रीडा संघटनांनाच त्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे, ज्या सरकारी अनुदान आणि मदत घेतात. बीसीसीआय क्रीडा मंत्रालयाकडून कोणतेही अनुदान घेत नाही. तथापि, विविध संघटनांनी बीसीसीआयला माहिती अधिकाराच्या (माहितीचा अधिकार) कक्षेत आणण्याची मागणी अनेक वेळा केली आहे.

आशिया कप 2025

# हार्दिक पंड्याची फिटनेस टेस्ट होणार

## सूर्या आणखी एक आठवडा NCA मध्ये राहणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आशिया कप २०२५ च्या आधी भारताचा स्टार अष्टपैलू हार्दिक पंड्या आणि टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या फिटनेसबाबत एक अपडेट समोर आले आहे. टाईम्स ऑफ इंडियामधील वृत्तानुसार, हार्दिक पंड्या ११ आणि १२ ऑगस्ट रोजी बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (NCA) येथे नियमित फिटनेस चाचण्या देईल, ज्याच्या आधारे भारताच्या आशिया कप २०२५ संघ निवडीपूर्वी त्याचे मूल्यांकन केले जाईल. पंड्याने मार्चमध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना (एकदिवसीय) खेळला होता.



त्याच वेळी, सूर्या अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त झालेला नाही. यामुळे, तो वेळेवर पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी फिजिओ आणि वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत आणखी एक आठवडा एनसीएमध्ये राहणार आहे. जूनमध्ये जर्मनीतील म्युनिक येथे त्याची स्पोर्ट्स हर्निया शस्त्रक्रिया झाली. आशिया कपसाठी भारतीय संघाची घोषणा अद्याप झालेली नाही. त्याआधी खेळाडूंची फिटनेस चाचणी घेतली जात आहे. गेल्या महिन्यात श्रेयस अय्यरची फिटनेस चाचणी घेण्यात आली.

जूनमध्ये जर्मनीतील म्युनिक येथे सूर्याची स्पोर्ट्स हर्निया शस्त्रक्रिया झाली. ३४ वर्षीय सूर्याने त्याच्या सोशल मीडिया हँडलवर लिहिले की, 'लाइफ अपडेट, माझ्या पोटाच्या खालच्या उजव्या बाजूला स्पोर्ट्स हर्नियाची शस्त्रक्रिया झाली आहे. मला हे कळवण्यास आनंद होत आहे की यशस्वी ऑपरेशननंतर, मी आता बरे होण्याच्या मार्गावर आहे.' सूर्याने फेब्रुवारीमध्ये इंग्लंडविरुद्ध त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना (टी-२०) खेळला होता.

आशिया कपची सुरुवात १९८४ मध्ये झाली. ही स्पर्धा आतापर्यंत १६ वेळा खेळली गेली आहे. भारताने सर्वाधिक म्हणजे ८ वेळा जिंकली आहे.

### आशिया कप ९ सप्टेंबरपासून सुरू होणार

आशिया कप २०२५ हा युएईमध्ये खेळला जाणार आहे. ही स्पर्धा ९ सप्टेंबरपासून सुरू होऊन २८ सप्टेंबरपर्यंत चालेल. यात आठ संघ सहभागी होतील. भारत, पाकिस्तान, ओमान आणि युएई यांना एकाच गटात स्थान देण्यात आले आहे. श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे गट-ब मध्ये आहेत. गटातील सर्व संघ एकमेकांविरुद्ध १-१ सामने खेळतील. भारताचा सामना १० सप्टेंबर रोजी युएई, १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तान आणि १९ सप्टेंबर रोजी ओमानशी होईल.



**मुंबई :** माझगाव येथील नामांकित साईनाथ गोविंदा पथकाने टी शर्टचे अनावरण केले. यावेळी पथकाचे पदाधिकारी प्रशांत आडारकर, सुनील वाघे, सुमित चौधरी, करून बांदेकर, संजय कदम आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# आरे कॉलनीत नेत्रहीन दिव्यांग मॅरेथॉन उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

अनिर्वेध चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व फ्रेंड्स ऑफ आरे यांच्या संयुक्त विद्यमाने, गोरेगाव पूर्व येथील आरे कॉलनी येथे, शंभर अंध दिव्यांग बांधवांची, अनिर्वेध वॉकेथॉन ( walkathon) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत मुंबई शहरातील शंभर नेत्रहीन स्त्री - पुरुष बांधवानी सहभाग घेतला होता. अंधदृष्टी बाधिताना समाजात सामान दर्जा मिळावा, त्यांचा आदर व सन्मान व्हावा. हा त्या मागील मुख्य हेतू होता.




स्पर्धेत श्रावणी चव्हाण प्रथम क्रमांकाने व रोहित यादव द्वितीय क्रमांकाने विजयी झाले. रमेश तांबे, सलोनी राहुल व सुमित केंद्रे ह्याना अनुक्रमे tin चार व पाचव्या क्रमांकाचे मानकरी झाले. विजयी स्पर्धेकाना रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रशास्तीत्रक देऊन सन्मानीत करण्यात आले. या सोहळयास विविध कॉलेजचे १५० विद्यार्थी स्पर्धेकाना मदत करण्यास बोलाविले होते.

संस्थेच्या वतीने ट्रस्टी अंजली सरकाळे, डी. पी. अग्रवाल, ए जी प्रसाद, सचिन सरकाळे, किरण शहा, अश्विनी बोरगावकर, कृतिका पवार, संतोष रहाटे, दीपक पुरी, शैलजा बोन्द्रे आदी सर्व पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित सर्व अंध दिव्यांग बांधवाना अनिर्वेद चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने टी शर्ट, रेनकोट, बिस्कीट, चॉकलेट, एनर्जी ड्रिंक, खाऊ, धान्य वाटप करून कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाले.

# विनायक निम्हण स्मृती राज्य कॅरम स्पर्धेत प्रशांत - केशर विजयी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सोमेश्वर फाऊंडेशनच्यावतीने व सनी निम्हण यांच्या पुढाकाराने गोविंदा गार्डन मंगल कार्यालय, पुणे येथे आयोजित केलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटात माजी विश्व विजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेने बाजी मारली. अंतिम फेरीत त्याने मुंबईच्या विकास धारियावर सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व ठेवले आणि २४-१०, २५-० असा सहज फडशा पडला. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी प्रशांत मोरेने रियाझ अकबर अलीवर १८-१२, २५-१ असा तर विकास धारियाने झैद अहमदवर ८-२५, १४-१२ व २१-१० असा विजय मिळवला होता. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत ठाण्याच्या झैद अहमदने माजी आंतर राष्ट्रीय विजेत्या रत्नागिरीच्या रियाझ अकबर अलीवर २४-११, २३-२० अशी मात केली.




तर महिला एकेरी गटात सिंधुदुर्गच्या केशर निर्गुणने अंतिम विजय मिळवताना प्रतिस्पर्धी ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरला २२-१७, २४-१४ असे सरळ दोन सेटमध्ये हरवून विजय संपादन केला. अंतिम फेरीत मजल मारणाऱ्या केशरने उपांत्य फेरीत मुंबईच्या सोनाली कुमारीवर २३-१६, २५-० अशी तर समृद्धीने मुंबईच्या प्राजक्ता नारायणकरवर २५-१७, १९-१८ अशी मात केली होती. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या सोनाली कुमारीवर ०-२५, २२-१७ व २०-१५ असा विजय संपादन केला.

विजेत्या खेळाडूंना मुख्य आयोजक सनी निम्हण, अर्जुन पुरस्कारार्थी कबड्डीपटू शांताराम जाधव, महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनलायचे सहाय्यक आयुक्त मिलिंद दिक्षित तसेच महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे कार्याध्यक्ष भारत देसडला यांच्या शुभहस्ते रोख पारितोषिके, चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी छत्रपती पुरस्कार विजेते विजय जाधव, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे मानद सचिव अरुण केदार, उपाध्यक्ष धनंजय साठे, यतिन ठाकूर, मंझर अहमद खान, खजिनदार अजित सावंत, सह सचिव अभिजित मोहिते, केतन चिखले, कॅरम असोसिएशन ऑफ पुणेचे कार्याध्यक्ष आशुतोष धोडमिसे व सचिव सुशील गुजर उपस्थित होते. सनी निम्हण यांनी कॅरम या खेळाला लोकाश्रय मिळण्याची गरज आहे असे सांगत प्रतिवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# झटपट मटकी फोड दहीहंडी स्पर्धा 2025चे आयोजन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

लोअर परेल येथील संयुक्त नवी चाळ उत्सव समिती व शिवसेना शाखा १९८ ( उद्धव बाबासाहेब ठाकरे ) यांच्या वतीने झटपट मटकी फोड दहीहंडी स्पर्धा आमदार आदित्य ठाकरे व प्रमुख मार्गदर्शक आमदार - विधानपरिषद सुनिल गोविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. या मध्ये २० संघा ने भाग घेतला.



प्रथम क्रमांक ओम साई गोविंद यांनी १४ मिनिटे १७ सेकंद मध्ये ७ थर लावून पटकाविला, दुसरा क्रमांक दुर्गामाता गोविंद पथक १६ मिनिटे ०३सेंकद , तिसरा क्रमांक एस.पी.सी.गोविंदा पथक १६ मिनिटे ४१ सेकंद , चौथा क्रमांक नागेश्वर गोविंदा पथक यांनी पटकाविला . प्रथम विजेत्या गोविंद पथक यांना रोख रक्कम ३५०००/- हजार व आकर्षक चषक, दूसरा विजेत्या गोविंद पथक यांना रोख रक्कम २५०००/- हजार व आकर्षक चषक, तिसरा विजेत्या गोविंद पथक यांना रोख रक्कम १५०००/- हजार व आकर्षक चषक, चौथा विजेत्या गोविंद पथक यांना रोख रक्कम ७०००/- हजार व आकर्षक चषक देण्यात आले. या झटपट मटकी फोड दहीहंडी स्पर्धाला अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# मुंबई महापालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी रिपब्लिकन पक्षाची आज महत्वपूर्ण बैठक

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले मार्गदर्शन करणार

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक उद्या मंगळवार दिनांक 12 ऑगस्ट 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता सांताक्रुझ पूर्व कालिना येथील भीमछाया सांस्कृतिक केंद्रात आयोजित करण्यात आली असून या बैठकीस रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीस रिपब्लिकन पक्षाच्या मुंबईतील सर्व प्रमुख पदाधिकारी जिल्हा तालुका वॉर्ड अध्यक्ष आणि सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी केले आहे.



रिपब्लिकन पक्षाची सदस्यता मोहिमेचा आढावा सुद्धा या बैठकीत घेण्यात येणार आहे. तसेच येत्या दिनांक 3 ऑक्टोबर रोजी रिपब्लिकन पक्षाचा 68 वा वर्धापन दिन सोहळा महाड येथे आयोजित करण्यात आला असून त्या कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत या बैठकीत महत्वपूर्ण मार्गदर्शन न.रामदास आठवले करणार आहेत. रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांच्या अध्यक्षतेत रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश ची ही बैठक आयोजित करण्यात आली असून रिपब्लिकन पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते पदाधिकारी या बैठकीला मार्गदर्शन करणार आहेत. रिपबिलकन पक्षाच्या मंगळवार दिनांक 12 ऑगस्ट रोजी होणाऱ्या या महत्वपूर्ण बैठकीस मुंबईतील रिपब्लिकन पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड; सरचिटणीस विवेक पवार खजिनदार सुनील बन्सी मोरे ; महिला आघाडी मुंबई अध्यक्षा उषाताई रामलू; युवक आघाडी अध्यक्ष सचिनभाई मोहिते यांनी केले आहे.

# नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी शौचालयांची 30 वर्षांची करार पद्धत रद्द करा - मंगलप्रभात लोढा

- जनता दरबारात शौचालयांच्या बाबतीत नागरिकांच्या अनेक तक्रारी
- मंत्री लोढा यांचे महापालिका आयुक्तांना पत्र

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शौचालयांच्या कंत्राटासाठी मुंबई महापालिकेचा ३० वर्षांचा करार अतिशय जाचक असून नागरिकांना त्यामुळे सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. हे करार रद्द करून नव्याने प्रक्रिया राबवावी अशी सूचना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता तथा मुंबई उपनगर सह पालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी केली आहे. यासंदर्भात लोढा यांनी मुंबई महापालिकेचे आयुक्त श्री. भूषण गगराणी यांना पत्रही लिहले आहे. पालिकेच्या एफ \नॉर्थ विभागात आयोजित केलेल्या जनता दरबारात अनेक नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्या होत्या. या वेळी आमदार प्रसाद लाड आणि कॅप्टन तमीळ सेल्वन उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी थेट जनतेशी संवाद साधावा अशा सूचना मंत्रिमंडळातील सदस्यांना केल्या आहेत. त्यानुसार मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांचाकडून नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी विभागवार जनता दरबार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याअनुषंगाने सायन कोळीवाडा मतदार संघातील एफ /उत्तर विभागात आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात नागरिकांनी शौचालयांच्या बाबतीत अनेक अडचणींचा पाढा वाचला. शौचालयांचा तीस वर्षांचा करार असल्याने कंत्राटदार मनमानी पद्धतीने शौचालये चालवत असून कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले.

अनेक ठिकाणी गळके छत, अस्वच्छ शौचालये , नादुरुस्त दरवाजे तसेच दिव्यांचीही सोय नसल्याचे नागरिकांनी सांगितले. या अडचणीची मंत्री लोढा यांनी तातडीने दखल घेतली. तसेच यासंदर्भात त्यांनी उपस्थित महापालिकेचे सहायक आयुक्त श्री. अरुण क्षीरसागर यांना या संबंधी त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले.

# गोरेगाव आरे कॉलनीत मेगा मेडिकल कॅम्प

## २०० हून अधिक नागरिकांना मिळाली मोफत आरोग्यसेवा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

वंचित समाजघटकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने देबाब्रता ऑरो फाउंडेशनतर्फे गोरेगाव आरे कॉलनीतील युनिट १३ येथे मेगा मेडिकल कॅम्प आयोजित करण्यात आला. या उपक्रमात द इस्थेटिक क्लिनिक्स, किया केअर फाउंडेशन आणि ॲजिलस डायग्नोस्टिक्स यांनी सहकार्य केले.



कॅम्पमधून स्थानिक रहिवाशांना मोफत वैद्यकीय सल्ला, औषधांचे वितरण आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. २०० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. कॅम्पचा एक विशेष भाग म्हणजे त्वचारोग तपासणी व उपचार. त्वचारोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ॲक्ने, एक्झिमा, बुरशीजन्य संसर्ग अशा आजारांचे निदान करून तत्काळ मोफत औषधे देण्यात आली. याशिवाय किया केअर फाउंडेशनच्या टीमकडून तोंडाच्या कर्करोगाची तपासणी व दंतचिकित्सा सेवा पुरवण्यात आल्या.

वैद्यकीय तपासण्यांबरोबरच आरोग्य शिक्षण, वैयक्तिक स्वच्छता, संसर्गाची लक्षणे ओळखणे आणि वेळीच उपचार घेणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कॅम्प स्वयंसेवक, आरोग्यसेवक आणि स्थानिक नेत्यांच्या सहकार्याने शिस्तबद्ध व स्वच्छ वातावरणात पार पडला. कॅम्पपूर्वी राबवलेल्या जनजागृती मोहिमेमुळे नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

# 500 हुन जास्त नागरिकांनी घेतली अवयवदानाची प्रतिज्ञा




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने जागतिक अवयवदान दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील झोनल ट्रान्सप्लान्ट कोऑर्डिनेशन कमिटीच्या सहयोगाने एका विशेष उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये जुहू बीचवर एका सर्वात मोठ्या अवयवदान प्रतिज्ञा भिंतीचे अनावरण करण्यात आले. यावेळी तब्बल ५०० हुन जास्त नागरिकांनी सहभागी होऊन जागतिक अवयवदान दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील विविध प्रतिष्ठित मंडळी, डॉक्टर्स, आरोग्यसेवा क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि मुंबईतील विविध सामाजिक गट यावेळी उपस्थित होते.

अवयवदान म्हणजे जीवनदान आहे, ही जागरूकता जनमानसात निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबईचे हेपॅटोलॉजी अँड

### नानावटी मॅक्स हॉस्पिटलने संपूर्ण शहरभर राबवली जागरूकता मोहिम

लिव्हर इंटेन्सिव्ह केयरचे चेअरमन डॉ. समीर शाह यांनी अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगत, उपस्थितांना प्रेरित केले. या उपक्रमामध्ये नामवंत ट्रान्सप्लान्ट स्पेशलिस्ट्सची माहितीपूर्ण भाषणे झाली, ज्यांनी अवयवदान प्रक्रियेविषयी माहिती दिली, ट्रान्सप्लान्ट यशस्वी झालेली उदाहरणे सांगितली तसेच अवयवदानामध्ये सार्वजनिक सहभागाचे महत्त्व किती जास्त आहे ते देखील सांगितले.

अशा प्रकारच्या उपक्रमांच्या माध्यमातून नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि झेडटीसीसी महाराष्ट्र यांनी अवयवदानाला प्रोत्साहन देण्याचे कार्य अव्याहतपणे सुरु ठेवले आहे, जीव वाचवण्याप्रती आणि अवयव निकामी झाल्यामुळे होणारे नुकसान भरून काढण्याप्रती वचनबद्धता अधोरेखित केली आहे.

## एअर इंडियाची दिल्ली-वॉशिंग्टन विमानसेवा 1 सप्टेंबरपासून बंद

**नवी दिल्ली :** एअर इंडियाने एक मोठा निर्णय घेतला आहे. दिल्ली ते वॉशिंग्टन ही विमानसेवा १ सप्टेंबरपासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. १ सप्टेंबर २०२५ नंतर वॉशिंग्टन डीसीला किंवा तेथून एअर इंडियाने बुकिंग केलेल्या ग्राहकांना पर्यायी प्रवासाची व्यवस्था देण्यात येणार असल्याचं एअर इंडियाने एअरलाइन्सने सांगितलं आहे. एअर इंडियाने सोमवारी घोषणा केली की कंपनी १ सप्टेंबर २०२५ पासून दिल्ली आणि वॉशिंग्टन डीसी या दरम्यानच्या त्यांच्या नॉन-स्टॉप फ्लाइट्स बंद करण्यात येणार आहेत. ही सेवा बंद करण्यामागचं कारण हे फ्लाइट्स अपग्रेडेशन आणि हवाई निर्बंधांमुळे ऑपरेशनल अडचणी येत असल्याचं सांगितलं आहे.एअर इंडिया एअरलाइन्सने या संदर्भात एक निवेदन जारी केलं आहे. त्या निवेदनात म्हटलं की, "एअर इंडियाच्या ताफ्यात नियोजित फ्लाइट्सच्या कमतरतेमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच गेल्या महिन्यात एअर इंडियाने त्यांच्या २६ बोईंग ७८७-८ विमानांचे रेट्रोफिटिंग सुरू केलं होतं. तसेच पाकिस्तानने हवाई क्षेत्र सतत बंद असल्यामुळे एअरलाइनच्या लांब पल्ल्याच्या फ्लाइट्सवर याचा परिणाम होत आहे.



# गाझामधील इस्रायलच्या हल्ल्यात 5 पत्रकारांचा मृत्यू

वृत्तसंस्था
गाझा

इस्रायलने रविवारी गाझा शहरातील पत्रकारांच्या तंबूवर हवाई हल्ला केला. यात अल जझीराचे प्रसिद्ध पत्रकार अनस अल-शरीफ यांच्यासह ५ पत्रकारांचा मृत्यू झाला. इस्रायली लष्कराने हा हवाई हल्ला केला असल्याची पुष्टी केली आहे. अल-शरीफ यांच्यावर हमासचा हस्तक असल्याचा आरोप होता. पण ते पत्रकार असल्याचे भासवत होते. ते रॉकेट हल्ल्यांसाठी जबाबदार असून ते दहशतवादी सेलचे नेतृत्व करत होते, असा आरोप इस्रायलने केला आहे.

गाझामधून स्वतंत्रपणे वृत्तांकन बंद करण्याच्या उद्देशाने ही ठरवून केलेली हत्या असल्याचे म्हणत अल जझीराने या घटनेचा निषेध केला आहे. ही घटना जवळपास दोन वर्षांपासून युद्ध सुरु झाल्यापासूनच्या सर्वात घातक घटनापैकी एक आहे. ज्यात सुमारे २०० माध्यमांतील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे, असे प्रेस फ्रीडम ग्रुप्सनी म्हटले आहे.




अल जझीरानेही या घटनेची पुष्टी केली आहे. त्यांनी त्यांच्या ५ कर्मचाऱ्यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला असल्याचे म्हटले आहे. प्रतिनिधी अनस अल-शरीफ, रिपोर्टर मोहम्मद करिकेह, कॅमेरा ऑपरेटर्स इब्राहिम झहेर, मोहम्मद नौफल आणि मोआमेन अलिवा अशी त्यांची नावे आहेत. पत्रकारांचा हा गट अल-शिफा मेडिकल कॉम्प्लेक्सच्या समोरील तंबूत होता. गेल्या बऱ्याच दिवसांपासून या ठिकाणीच मीडिया कर्मचारी थांबत होते. २८ वर्षीय अल-शरीफ यांना युद्धस्थितीचे वार्तांकन करणारे अरबी भाषेतील प्रसिद्ध पत्रकार म्हणून ओळखले जाते. त्यांनी त्यांच्या मृत्यूच्या काही तास आधीच, X वर जवळच झालेल्या इस्रायली हल्ल्यांचे फुटेज पोस्ट केले होते. त्यांच्या मृत्यूमुळे गाझामधील पत्रकारांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. गाझामध्ये इस्रायली लष्कराच्या सुरक्षेविना परदेशी पत्रकारांना प्रवेश बंदी आहे. यामुळे स्थानिक पत्रकार सर्वाधिक वृत्तांकन करतात. अल-शरीफ हा हमासच्या दहशतवादी सेलचा प्रमुख म्हणून काम करत होता. त्याने इस्रायली नागरिक आणि इस्रायली सैन्यावर रॉकेट हल्ले केले होते. गाझामधून मिळालेल्या गुप्तचर आणि कागदपत्रांमध्ये ज्यात रोस्टर, दहशतवादी प्रशिक्षण यादी आणि पगाराच्या नोंदी आदींचा समावेश आहे. यातून सिद्ध होते की तो हमासचा हस्तक होता. प्रेस बॅज हा दहशतवादी कारवायासाठी ढाल नाही, असे इस्रायली संरक्षण दलाने म्हटले आहे.

# 'जगदीप धनखड नजरकैदेत, ते सुरक्षित नाहीत...'

## राऊतांचा दिल्लीत लेटरबॉम्ब

वृत्तसंस्था
नवी दिल्ली



उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे राजीनामा दिल्यापासून गायब आहेत. ते नेमके कुठे आहे? त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचे खासदार सांगत आहेत. खासदार कपिल सिब्बल यांनी धनखड यांच्या विषयी काळजी व्यक्त केली होती. आता शिवसेना उद्धव बाळासाहे ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी गृहमंत्री अमित शाह यांना पत्र पाठवत जगदीप धनखड कुठे आहेत याची विचारणा केली आहे.

'आपल्या उपराष्ट्रपतींच्या बाबतीत नक्की काय घडले आहे? ते कुठे आहेत? त्यांची तब्येत कशी आहे? ते सुरक्षित आहेत का? देशाला या प्रश्नांची खरी माहिती मिळाली पाहिजे. दिल्लीमध्ये अफवा पसरत आहेत की धनखड यांना त्यांच्या निवासस्थानी नजरकैदेत ठेवण्यात आले असून ते सुरक्षित नाहीत.', असे राऊत यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

राऊत यांनी पत्रात म्हटले आहे की,'राष्ट्रीय सुरक्षा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित मी हे पत्र विशिष्ट कारणासाठी लिहित आहे. 21 जुलैला अचानक उपराष्ट्रपतींनी यांनी सायंकाळी सहानंतर प्रकृती कारणास्तव राजीनामा दिल्याची घोषणा झाली. हे ऐकून सर्वांनाच धक्का बसला.पण यापेक्षाही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे 21 जुलैपासून आजपर्यंत आपल्या उपराष्ट्रपतींच्या ठिकाणाबाबत कुठलीही माहिती उपलब्ध नाही.' 'ते सध्या कुठे आहेत? त्यांची तब्येत कशी आहे? या बाबींवर कोणतीही स्पष्टता नाही. राज्यसभेतील काही सदस्यांनी त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात अपयश आले. त्यांच्याशी किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांशी कोणताही संवाद साधता आला नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे.', असे देखील राऊत यांनी सांगितले आहे.

'राज्यसभेतील खासदार तर सर्वोच्च न्यायालयात 'हेबिअस कॉर्पस' याचिका दाखल करण्याचा विचार करत आहेत. कारण आम्हाला धनखड यांच्या ठिकाणाबाबत व त्यांच्या सुरक्षिततेबाबत काळजी वाटत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या दारात जाण्यापूर्वी मी आपल्याकडून माहिती मागणे योग्य ठरेल असे मला वाटले. आपण माझी भावना समजून घ्याल आणि जगदीप धनखड यांच्या सध्याच्या ठिकाणाबाबत तसेच त्यांच्या सुरक्षितते व प्रकृतीबाबत खरी माहिती द्याल, अशी मला आशा आहे.' असे राऊत यांनी पत्रात नमूद केले आहे.

पान 1 वरुन..

## मराठा मोर्चात दंगली घडवण्याचा कट

मराठा आंदोलनक मनोज जरांगे यांनी मुंबईत मोर्चाची हाक दिली आहे. राज्यभरातील मराठा बांधव 29 ऑगस्ट रोजी मुंबईत दाखल होणार आहे. त्या पार्श्वभूमिवर जरांगे राज्यभर दौऱ्यांच्या माध्यमातून आढावा घेण्यासह समाज बांधवांना आवाहन करत आहेत. एकीकडे मराठा समाजाची आंदोलनाची तयारी सुरू असताना दूसरीकडे गोवा येथे नुकतेच ओबीसी अधिवेशन संपन्न झाले. ज्यामध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी ओबीसी नेत्यांना अश्वस्थ करत ओबीसींसाठी लढणार असल्याचा दावा केला. गोवा येथील ओबीसी अधिवेशनामध्ये मराठा आंदोलनात हिंदू-मुस्लीम, मराठा- ओबीसी दंगल घडवण्याचा कट रचल्याचा आरोप करत मराठा समाजाने वेळीच सावध राहण्याचे अवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे.

## 'इंडिया'चा एल्गार

राहुल गांधी आणि इतर खासदारांनी त्यांना मदत केली. यापूर्वी दोन्ही सभागृहात या मुद्द्यावर मोठा गोंधळ झाला. प्रियंका आणि डिंपलसह अनेक खासदार 'वोट चोर गड्डी सोड' असे नारे लावताना दिसले. ताब्यात घेतल्यानंतर राहुल गांधी म्हणाले की, ही संविधान वाचवण्याची लढाई आहे. ही एक व्यक्ती-एक मताची लढाई आहे, म्हणून आपल्याला स्वच्छ मतदार यादीची आवश्यकता आहे. प्रियंका गांधी म्हणाल्या की, हे सरकार घाबरलेले आणि भित्रे आहे.

# दिल्ली एनसीआरमधील भटक्या कुत्र्यांना शेल्टर होममध्ये पाठवा

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

दिल्लीसह राष्ट्रीय राजधानी परिसरातील (एनसीआर) सर्व भटक्या कुत्र्यांना शेल्टर होममध्ये पाठवण्यात यावे. तसे करण्यापासून कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेने अधिकाऱ्यांना रोखले तर त्यांना कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागेल. जर भटक्या कुत्र्यांना उचलण्यासाठी आवश्यक झाले तर अधिकारी बळाचा वापर देखील करू शकतात, असे महत्त्वाचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिले आहेत.

भटक्या कुत्र्यांनी मुलांवर हल्ला केल्याच्या वृत्ताची स्वतःहून दखल घेऊन न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने कुत्रा चावणे आणि रेबीजच्या धोक्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले आहे की भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानांमध्ये ठेवावे आणि सार्वजनिक ठिकाणी सोडू नये. कोणत्याही परिस्थितीत लहान मुले आणि मुले रेबीजचे बळी पडू नयेत. या कृतीमुळे त्यांच्यात असा विश्वास निर्माण झाला पाहिजे की ते भटक्या कुत्र्यांच्या भीतीशिवाय मुक्तपणे फिरू शकतात.

सुनावणीदरम्यान, न्या. पारडीवाला यांनी नसबंदी केलेल्या कुत्र्याला त्याच भागात परत सोडण्याचा तर्क काय आहे असा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी म्हटले, नसबंदी केलेली असो वा नसो, समाज भटक्या कुत्र्यांपासून मुक्त असला पाहिजे. शहराच्या कोणत्याही भागात किंवा बाहेरील भागात एकही भटका कुत्रा फिरताना दिसू नये. हे पहिले पाऊल आहे. एखाद्या भागातून भटक्या कुत्र्याला उचलल्यानंतर त्याची नसबंदी करून पुन्हा त्याच ठिकाणी सोडणे हे अतिशय हास्यास्पद आहे, असेही न्यायालयाने म्हटले.

तातडीने आश्रयस्थळे उभारणी – राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, एमसीडी आणि एनडीएमसीने तातडीने भटक्या कुत्र्यांसाठी आश्रयस्थळांची उभारणी करावी. पुढील ८ आठवड्यांत पायाभूत सुविधांच्या प्रगतीचा सविस्तर अहवाल न्यायालयात सादर करावा.

आश्रयस्थळातील सोयी – आश्रयस्थळी भटक्या कुत्र्यांची नसबंदी, लसीकरण आणि दीर्घकालीन देखभाल करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नेमणे बंधनकारक. आश्रयस्थळांमधील



कुत्र्यांवर सीसीटीव्हीद्वारे सतत नजर ठेवावी, जेणेकरून कोणताही कुत्रा बाहेर नेला जाणार नाही.

नियोजनबद्ध कार्यक्रम पहिला टप्पा – ५,००० कुत्र्यांची व्यवस्था – एमसीडी/एनडीएमसीने आणि इतर संबंधित संस्थांनी पहिल्या टप्प्यात पुढील ६–८ आठवड्यांत किमान ५,००० कुत्र्यांसाठी आश्रयाची व्यवस्था करावी. संवेदनशील परिसर, गावे व शहरांच्या बाहेरील भागांतून कुत्रे तातडीने उचलावेत.

## कर्नाटकचे मंत्री राजन्ना यांचा राजीनामा



वृत्तसंस्था
बंगळुरु

मतदार यादीतील अनियमिततेवरून त्यांच्याच पक्षावर टीका करणाऱ्या विधानानंतर काँग्रेस हायकमांडने त्यांना राजीनामा देण्यास सांगितल्यानंतर कर्नाटकचे सहकार मंत्री के.एन. राजन्ना यांनी सोमवारी मंत्रिमंडळातून राजीनामा दिला.

खरं तर, राजन्ना यांनी रविवारी म्हटले होते की जर अनियमितता आमच्या डोळ्यांसमोर घडली आणि आम्ही त्यावेळी आक्षेप घेतला नाही, तर आज तक्रार करण्याचे औचित्य काय आहे? ते म्हणाले,तीन ठिकाणी एका व्यक्तीचे नाव नोंदवण्यात आले आणि कमी लोकवस्ती असलेल्या भागात संशयास्पद नावे जोडण्यात आली. हे सर्व आमच्या डोळ्यासमोर घडले, परंतु कोणतेही देखरेख केली गेली नाही. हे पक्षाचे अपयश आहे.

येथे, राजन्ना यांनी आधी राजीनामा देण्यास नकार दिला होता आणि म्हटले होते- मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करेन, तोपर्यंत मी काहीही बोलणार नाही. कोणीतरी विचारले म्हणून मी राजीनामा का देऊ? पण हायकमांडच्या सूचनेनंतर त्यांनी राजीनामा दिला.

## सरकार पुरुषांसाठी जागा आरक्षित ठेवू शकत नाही, हे समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन

### सैन्याच्या कायदेशीर विंगमधील आरक्षण धोरण केले रद्द

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

न्यायाधीश ॲडव्होकेट जनरल (JAG) शाखेत पुरुष आणि महिला अधिकाऱ्यांसाठी २:१ च्या प्रमाणात आरक्षण देण्याच्या भारतीय लष्कराच्या धोरणाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी रद्दबातल ठरवले. जेएजी ही लष्कराची कायदेशीर शाखा आहे, जिथे



अधिकारी कायदेशीर सल्ला देतात, कोर्ट-मार्शल केसेस देतात आणि सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कायदेशीर गरजा पूर्ण करतात.

दोन महिला उमेदवारांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, हे धोरण मनमानी आहे आणि संविधानानुसार सर्वांना दिलेल्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की,

सरकार फक्त पुरुषांसाठी जागा आरक्षित ठेवू शकत नाही. महिलांसाठी जागा मर्यादित करणे चुकीचे आहे. खऱ्या लिंग तटस्थतेचा अर्थ असा आहे की सर्वात पात्र उमेदवाराची निवड केली जाते. प्रत्यक्षात, गुणवत्ता यादीत दोन महिला उमेदवार चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर होत्या, परंतु महिलांसाठी फक्त ३ जागा असल्याने त्यांना संधी मिळाली नाही. तर त्यांच्यापेक्षा कमी गुण असलेल्या पुरुष उमेदवारांची निवड झाली.

## बँकेतून 14 कोटींचे सोने, 5 लाख रोकड लुटली

### जबलपूरमध्ये सशस्त्र गुन्हेगारांचा दरोडा

#### 15 मिनिटांत पळून गेले; 4 जिल्ह्यांत अलर्ट

वृत्तसंस्था
जबलपूर

मध्य प्रदेशातील जबलपूरपासून ५० किमी अंतरावर असलेल्या खिटोला परिसरात सोमवारी सकाळी ११ वाजता सशस्त्र दरोडेखोरांनी बँक लुटली. दरोडेखोरांनी बँक कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवला. त्यानंतर १५ मिनिटांत १४ किलो ८०० ग्रॅम सोने आणि ५ लाख ७० हजार रुपये रोख घेऊन पळून गेले. लुटलेल्या सोन्याची अंदाजे किंमत १४.५ कोटींहून अधिक आहे. पोलिसांनी जिल्ह्यात नाकाबंदी केली आहे. कटनी, मांडला, दिंडोरीसह संपूर्ण जबलपूरच्या पोलिसांना सतर्क करण्यात आले आहे.

जबलपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना इसाफ स्मॉल फायनान्स बँकेत घडली. सहा तरुण तीन बाईकवरून येथे आले. त्यांनी बँकेबाहेर त्यांच्या बाईक पार्क केल्या आणि एक एक करून आत शिरले. ते काही वेळ बँक कर्मचाऱ्यांचे काम पाहत राहिले. त्यानंतर त्यांनी बंदुका काढल्या आणि अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धमकावू लागले. ते वारंवार गोळीबार करण्याची धमकी देत होते. दरोडेखोर बँकेतून बाहेर पडताच अधिकाऱ्यांनी अलार्म सायरन वाजवला.

आतापर्यंतच्या पोलिस तपासात असे दिसून आले आहे की इसाफ स्मॉल फायनान्स बँक सोने तारणावर कर्ज देते. बँक उघडण्याची वेळ सकाळी १०.३० आहे, परंतु सणामुळे गेल्या काही दिवसांपासून ती सकाळी ८ ते ९ या वेळेत उघडत आहे. घटनेच्या वेळी सुरक्षा रक्षक तैनात नव्हता.

## तीन वर्षांच्या लेकीलाच बापाने खाऊ खातले विषारी बिस्किट

नवी दिल्ली

सुरक्षा दलात कार्यरत असलेल्या एका जवानाने पोटच्याच तीन वर्षाच्या लेकीचा जीव घेतला. विषारी बिस्कीट खायला देऊन चिमकुलीची हत्या केली. पोलिसांनी आरोपी जवानाला अटक केली असून, न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. रथिंद्र देबवर्मा असे आरोपी जवानाचे नाव आहे. तो १० त्रिपुरा स्टेट रायफल्स दलात कार्यरत आहे. त्रिपुरातील खोवाई जिल्ह्यात ही घटना घडली आहे. आरोपीची पत्नी मिताली देबवर्मा म्हणाली, आम्ही माझ्या बहिणीच्या घरी बेहलाबारीला गेलो होतो. तिथे गेल्यानंतर माझा पती माझ्या बहिणीच्या मुलाला आणि आमच्या मुलीला बिस्किट आणायला घेऊन गेला. त्यानंतर ते बराच वेळ तिथे होते, तेव्हा माझ्या बहिणीने बघितले की, माझ्या मुलीला उलट्या होत आहेत. तिच्या तोंडातून विषारी द्रवासारखा वास येत होता. मी तिथे गेले आणि माझ्या पतीचा गळा पकडला आणि विचारलं की, तू मुलीला काय खायला दिलं आहेस. तो म्हणाला की असं काहीही खायला दिलं नाही. माझी मुलगी जीबी रुग्णालयात मेली. मी त्याचे केस धरले, तेव्हा त्याने मला मारहाण केली.

## उत्तराखंडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 14 जागांवर रिपब्लिकनचा झेंडा

**देहरादून।** उत्तराखंड राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने घवघवीत यश मिळवित 14 जागांवर विजय मिळविला आहे. उत्तराखंड राज्यातील गाढवाल ; कुमाव या जिल्ह्यातील ग्रामपंचायत ; जिल्हा परिषद ; नगरपरिषद निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने 14 जागांवर विजय मिळविला आहे.गढवाल भागात रिपब्लिकन पक्षाचे 4 ग्राम प्रधान निवडून आले आहेत. कुमाव क्षेत्र येथे 1 ग्राम पंचायत आणि 4 जिल्हा परिषद सदस्य रिपब्लिकन पक्षाचे निवडून आले आहेत. उत्तराखंड च्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन पक्षाला मिळालेला विजय हा महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा विजय आहे.आगामी काळात रिपब्लिकन पक्ष उत्तराखंड सहित संपूर्ण उत्तर भारतात विजयी घोडदौड करेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.विधानसभा जिंकण्याचा रस्ता हा स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीतील विजयावर अवलंबून असतो.त्यामुळे विधानसभा जिंकून देणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था या महत्वाच्या आहेत.त्यात रिपब्लिकन पक्षाला मिळालेला विजय हा रिपब्लिकन पक्षाच्या उत्तराखंड मधील पुढील वाटचालीसाठी महत्वाचा आहे असे ना.रामदास आठवले यांनी म्हंटले आहे.

### अमेरिका-चीन टॅरिफ डेडलाइनसाठी फक्त 1 दिवस शिल्लक

## चीनवर कर लादणे कठीण, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प अजूनही विचार करतायत...

वृत्तसंस्था
वॉशिंग्टन

चीनवर अधिक शुल्क लादण्याच्या प्रश्नावर अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स म्हणाले की, असे पाऊल उचलणे अधिक कठीण आणि हानिकारक असू शकते. फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत व्हान्स म्हणाले की, चीनवर शुल्क लादण्याचा विचार केला जात आहे, परंतु अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

व्हान्स म्हणाले की, चीनशी संबंध केवळ तेलाच्या मुद्द्यापुरते मर्यादित नाहीत, तर इतर अनेक बाबींवर परिणाम करतात, त्यामुळे



हे प्रकरण अधिक कठीण आहे. अमेरिकेने सध्या चीनवर ३०% कर लादला आहे. त्याची अंतिम मुदत १२ ऑगस्ट रोजी संपत आहे.

अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा चीनने जुलैमध्ये रशियाकडून १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे तेल खरेदी केले आहे. तथापि, या वर्षी आतापर्यंतची एकूण खरेदी २०२४ च्या तुलनेत ७.७% कमी आहे. रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या आपल्या निर्णयाचे चीनने समर्थन केले आणि म्हटले की कोणत्याही देशासोबत आर्थिक आणि ऊर्जा सहकार्य करणे हा चीनचा कायदेशीर अधिकार आहे. ते त्यांच्या राष्ट्रीय हितांनुसार ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करेल.

ट्रम्प यांचे वरिष्ठ सल्लागार पीटर नवारो यांनी यापूर्वी म्हटले होते की चीनवर आणखी शुल्क लादले जाण्याची शक्यता कमी आहे. त्यांनी इशारा दिला होता की असे केल्याने अमेरिकेचेही नुकसान होऊ शकते.

गेल्या आठवड्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या बहाण्याने भारतावर २५% अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली. त्यानंतर भारतावरील एकूण कर ५०% झाला. हा अतिरिक्त कर २७ ऑगस्टपासून लागू होईल.

भारताने या निर्णयावर जोरदार टीका केली आणि तो चुकीचा असल्याचे म्हटले. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की त्यांची तेल आयात पूर्णपणे बाजारपेठेवर आधारित आहे आणि त्यांच्या १.४ अब्ज लोकांच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ती आवश्यक आहे.

## 'सद्भावना' स्वस्थ समाजाचे लक्षण तर 'धर्मयुक्त' जीवन हेच उद्दिष्ट - सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

वृत्तसंस्था
इंदूर

समाज आहे, म्हणून सद्भावना आहे. सद्भावना हे स्वस्थ समाजाचे लक्षण आहे. ते आपलेपणातील एक नाते आहे. ते सोशल कॉन्ट्रॅक्ट नाही. समाजात व्यक्ती आणि कुटुंब या दोन्हींचे अस्तित्व असते. समाजाचे साधारण उद्दिष्ट हे धर्मयुक्त जीवन असते. असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

इंदूरच्या स्थानिक ब्रिलियंट कन्व्हेन्शन सेंटर येथे मालवा प्रांतातील प्रांत व राष्ट्रीय स्तरावरील समाजप्रमुखांच्या सामाजिक सद्भाव बैठक संपन्न झाली. त्यावेळेस ते बोलत होते. या बैठकीस मालवा प्रांतातील १११ समाजांचे २८४ समाजप्रमुख उपस्थित होते. त्यांनी




आपल्या समाजाच्या जनकल्याण व सेवा कार्यांची माहिती सर्वांसमोर मांडली.

उपस्थितांना संबोधत सरसंघचालक पुढे म्हणाले, माणसाला फक्त शरीर व उपभोगाची वस्तू मानणाऱ्या विचारसरणीने संपूर्ण युरोप उद्ध्वस्त केला आणि आता हीच विचारसरणी भारताच्या कुटुंबव्यवस्थेला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे. संस्थांना आपल्या नियंत्रणाखाली घेऊन समाज फोडण्यासाठी यांचा जगातील ५०–६० घराण्यांशी गठजोड झाला आहे. यांचा उद्देश भारताच्या बाजारावर कब्जा करणे हा आहे. इंग्लंडमध्ये २०२१ साली झालेल्या 'डिस्मॅन्टलिंग हिंदुत्व' या सेमिनारच्या मागे हाच विचार होता.

पुढे ते म्हणाले, "भारतामध्ये धर्म आणि राष्ट्र हे एकच असून त्यासाठी केले जाणारे कार्य हे ईश्वरीय कार्यच आहे. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद यांसारख्या महापुरुषांनी जात-पात विसरून समाजात राष्ट्रभाव जागृत करण्याचे कार्य केले. समाज व कुटुंबासाठी मातृशक्तीचा विचार पुरुषांपेक्षा अधिक व्यापक असतो. आपापल्या क्षेत्रात स्थानिक पातळीवर सर्व जाती-बिरादरींनी एकत्र बसून आपल्या बिरादरीच्या उन्नतीसाठी विचार करावा तसेच दुर्बल समाजाला उंचावण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत. सर्व समाज मिळून राष्ट्र व हिंदू समाजाच्या प्रश्नांचे निराकरण करावे. आपण हिंदू आहोत, प्रत्येक हिंदूचे सुख-दुःख हेच आपले सुख-दुःख आहे."